www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ डोंबिवलीतील रुणवाल गार्डन ते वाशी, डोंबिवली रेल्वे स्थानक...
पान ३ वर...

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ मुख्यमंत्र्यांनी घेतला फ्लॅगशीप योजनांचा आढावा प्रधानमंत्री...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २३६ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, ०४ फेब्रुवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# राज्यात जलसंधारणाच्या कामाला गती येणार, मुख्यमंत्र्यांना मिळणार 'नाम' ची साथ, बैठकीत ३ महत्त्वाचे करार

● मुंबई, विशाल कारंडे :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज मंत्रालयात महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत जलसंधारणाच्या कामाला गती देण्यावर चर्चा झाली आहे. तसेच ३ महत्वाचे करार देखील झाले असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. यावेळी अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे तसेच विविध विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते.

**नाम संस्थेनं ९ वर्षात १ हजारपेक्षा अधिक गावात काम केलं : मकरंद अनासपुरे**

एका करारासंदर्भात सरकारसोबत बैठक होती, अशी माहिती अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी बैठकीपूर्वी दिली होती. नाम ही संस्था आमची नाही सर्वांची आहे. ही संस्था १० वर्ष पूर्ण करत आहे. त्याचा आनंद असल्याचे अनासपुरे म्हणाले. ९ वर्षात १ हजारपेक्षा अधिक गावात आम्ही काम



केलं आहे. आता यां वर्षात अधिक गावात काम करु असेही अनासपुरे म्हणाले. यावेळेस २३ जिल्ह्यात काम करणार आहोत, लोकांनी सहभागी व्हावं असं आम्ही त्यांनी आवाहन करत असल्याचे अनासपुरे म्हणाले. लोकांनी लोकांसाठी सुरु केलेली ही चळवळ आहे. सरकार चांगली मदत करत आहे. त्यामुळं पुढेही चांगलं काम होईल अशी आशा असल्याचे अनासपुरे म्हणाले.

## गावागावात जाऊन काम करायचंय : नाना पाटेकर

नाम फाउंडेशनचं जलसंधारणचं काम आहे त्याची बैठक होती. सामुदायिकरित्या जलयात्रा करायची असल्याचे अभिनेते नाना पाटेकर म्हणाले. गावागावात जाऊन काम करायचं आहे. प्रत्येक गावात जाऊन काम करायचं आहे. लोक सहभाग होतायत त्यासंदर्भात बैठक होती. मागच्या वेळी काम सुरु केलं तेव्हा फडणवीस होते मध्यंतरी शिंदे होते आताही फडणवीस आहेत असे नाना पाटेकर म्हणाले. त्यामुळं कामाला कोणतीही समस्या नसल्याचे पाटेकर म्हणाले.

## ३ महत्वाचे करार कोणते?

**१) टाटा मोटर्स, नाम फाऊंडेशन आणि मृद व जलसंधारण विभाग**

टाटा मोटर्स, नाम फाऊंडेशन आणि मृद व जलसंधारण विभाग यांच्यात जलसंधारणाच्या कामालासंदर्भात एक महत्वाचा करार करण्यात आला आहे. यामाध्यमातून २३ जिल्ह्यात १००० जलाशय तयार करण्यात येणार आहेत. नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या उपस्थित हा करार करण्यात आला आहे.

**२) भारतीय जैन संघटना आणि मृद व जलसंधारण विभाग**

भारतीय जैन संघटना आणि मृद व जलसंधारण विभाग यांच्यात देखील जलसंधारणाच्या कामासंदर्भात एक करार झाला आहे. जलसंधारणासाठी मनुष्यबळ पुरवण्यात येणार आहे.

**३) MRSAC आणि मृद व जलसंधारण विभाग**

MRSAC आणि मृद व जलसंधारण विभाग यांच्यातही करार झाला आहे. यामध्ये जलसाठे तयार करण्यासाठी तंत्रज्ञान पुरवण्यात येणार आहे.

## ( ) थोडक्यात ( )



### मुंबई फिरायला आलेल्या महिलेवर हमालाकडून अत्याचार

**मुंबई :** मुंबईतील वांद्रे रेल्वे स्थानकावर एका महिलेवर हमालानं अनैसर्गिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. शनिवारी मध्यरात्री ही घटना घडल्याचं सांगितलं जातय. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला उत्तराखंडमधून आपल्या मुलासोबत मुंबई फिरण्यासाठी आली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला शनिवारी रात्री आपल्या नातेवाईकांकडं जाणार होती. त्यामुळं काही वेळासाठी ती वांद्रे स्थानकावर झोपली. यावेळी तिकिट तपासण्याच्या बहाण्यानं एक २७ वर्षीय हमाल महिलेजवळ आला. त्यानं तुमच्याकडचं तिकिट दाखवा, असं म्हणत महिलेला बाजूला असलेल्या एका मोकळ्या रेल्वेच्या डब्यात नेलं. यावेळी आरोपीनं जबरदस्तीनं महिलेवर अनैसर्गिक अत्याचार केला. या घटनेनंतर पीडित महिलेनं रेल्वे पोलिसांकडं धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानंतर रेल्वे पोलिसांनी काही तासातच आरोपीला बेड्या ठोकल्या.

### साई संस्थानच्या दोन कर्मचाऱ्यांची हत्या!



**शिर्डी :** अहिल्यानगर, शिर्डी येथे दि. ३ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास हत्याकांड घडला. साई संस्थानाच्या कर्मचाऱ्यांवर चाकू हल्ला झाला. सकाळी कामावर जात असताना रस्त्यात आधी एका कर्मचाऱ्यावर हल्ला करण्यात आला. काही वेळाने दुसऱ्या कर्मचाऱ्यावर हल्ला झाल्याची धक्कादायक बातमी समोर आली. यामध्ये सुभाष साहेबराव घोडे आणि नितीन कृष्णा शेजुळ यांचा मृत्यू झाला.

कोट्यावधी भाविकांचे देवस्थान असणाऱ्या शिर्डीमध्ये दोन सामान्य माणसांवर चाकू हल्ला करण्यात आला. त्या दोन व्यक्ती शिर्डी देवस्थानात काम करणारे कर्मचारी होते. पहाटे ४ च्या सुमारास कामाला जात असताना त्यांच्यावर रस्त्यात हल्ला केला. पहाटेच्या वेळी जास्त वर्दळ नसल्यामुळे हा प्रकार घडून आला. सुभाष घोडे हे करडोबा नगर चौकाचे तर नितीन कृष्णा शेजुळ साकुरी शिवचे रहिवासी आहेत. हत्या घडलेल्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पोलिसांनी लवकरात लवकर या प्रकरणाचा तपास लावावा अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात आली. नशेखोराने हे कृत्य केल्याचा संशय व्यक्त केला आहे. एका संशयिताला ताब्यात घेतल्याची माहितीदेखील समोर आली आहे. शिर्डीत गुन्हेगारी प्रवृत्ती बळावत चालल्याचं आपल्याला दिसून येत आहे.

# रायगड जिल्ह्यातील २६ ग्रामपंचायत नव्याने बांधण्यात येणार, इमारतीसाठी साडेपाच कोटींचा निधी


● अलिबाग, फरीद डावरे :

रायगड जिल्ह्यातील २६ ग्रामपंचायतीना स्वतःचे ग्रामपंचायत कार्यालय बाधण्यासाठी ५ कोटी ५५ लाख रुपये निधीस मंजुरी मिळाली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर भारत बाष्टेवाड व ग्रामपंचायत विभाग मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांनी दिली. राज्यातील ज्या ग्रामपंचायतीना स्वतःच्या कार्यालया साठी स्वतंत्र इमारत नाही, अशा ग्रामपंचायतीना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वतःचे कार्यालय नाही अशा २६ ग्रामपंचायतींना स्वतःची कार्यालय बांधण्यासाठी बाळासाहेब ठाकरे स्मृती



मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत निधी मिळावा यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाने ग्राम विकास विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.या प्रस्तावाला मान्यता मिळाली असून ग्रामपंचायतींना इमारत बांधण्यासाठी पाच कोटी ५५ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.या सर्व ग्रामपंचायत इमारतीचे हरित ग्रामपंचायत म्हणून बांधकाम करण्यात यावे, तसेच ग्रामपंचायतीला सोलरच्या माध्यमातून वीज पुरवठा उपलब्ध केला जावा, तसेच बांधकाम करताना हरित संकल्पना जोपासण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. निधी मंजूर झालेल्या ग्रामपंचायती कोणत्या अलिबाग-वैजाली.पेण-काळेश्री,कोपर .पनवेल- जांभिवली .उरण-नागाव, म्हातावली,नवघर. कर्जत-जिते,वडप, अंभेरपाडा.खालापूर- आसरे, वरोसे, लोधिवली, चौक. माणगाव- हरकोळ, टेनपाले.महाड-शैले, आसनपोई.म्हसळा - निगडी. पोलादपूर- पालचीळ, ओबली महाळुंगे, महालंगुर. श्रीवर्धन- नागलोली, सायगाव.मुरुड- आगरदांडा या २६ ग्रामपंचायतींना ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यासाठी पाच कोटी ५५ लाख रुपये निधी मिळाला होता.

# राज्यभरातील खासगी रुग्णालयांची झडती



● नागपूर, नितीन देवळेकर :

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण खात्याने राज्यभरातील खासगी रुग्णालयांकडून नियमांचे पालन होते की नाही, याची तपासणी मोहीम हाती घेतली आहे. त्यासाठी आरोग्य विभागाने जिल्हास्तरावर तपासणी पथके तयार केली आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांनी काय काळजी घ्यावी, याबाबतही सूचना केल्या, परंतु अनेक रुग्णालये नियमांचे पालन करत नसल्याचे पुढे आले आहे.


सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आरोग्य खात्यातील अधिकाऱ्यांना केंद्र शासनाच्या क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट एक्ट २०१० च्या धर्तीवर व महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट एक्टमध्ये महत्त्वाच्या सुधारणा लागू करण्याबाबतचा योग्य तो निर्णय तात्काळ घेण्याचे निर्देशित केले होते. त्यानंतर मंत्र्यांनी घेतलेल्या बैठकीत रुग्णहितार्थ खासगी रुग्णालये नियमांचे पालन करीत आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी राज्यातील खासगी रुग्णालयांची एक महिन्यात तपासणी करून कारवाई करण्याची सूचना केली होती. पान २ वर

## जबाबदारी कुणावर?

आरोग्य मंत्र्यांच्या सूचनेनंतर राज्याच्या आरोग्य व कुटुंब कल्याण खात्याने या तपासणीची जबाबदारी प्रत्येक जिल्हा रुग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा परिषदांमधील जिल्हा आरोग्य अधिकारी, महापालिकांचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी या स्थानिक पर्यवेक्षकीय अधिकारी यांच्यावर सोपविली आहे.

# अंबरनाथमध्ये चाकूने भोसकून महिलेची हत्या हल्लेखोराला पोलिसांनी घेतलं ताब्यात

● कल्याण, गणेश बागडे :



अंबरनाथमध्ये भर दिवसा एका महिलेची चाकूने भोसकून हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे. हुतात्मा चौकाकडून स्टेशनकडे जाणाऱ्या साईबाबा मंदिराच्या रस्त्यावर ही घटना घडली. ओळखीच्याच व्यक्तीने ही हत्या केल्याचे समोर येत आहे. सीमा कांबळे ही महिला आणि एक पुरुष असे दोघे या साईबाबा मंदिराच्या शेजारील पायऱ्यांवर बोलत बसलेले असतानाच अचानक त्यांच्यात वाद झाला आणि पुरुषाने महिलेच्या पोटात चाकू भोसकून तिथून पळ काढला. यानंतर तिथे जमलेल्या लोकांनी या महिलेला तातडीने जवळच्या एका खासगी रुग्णालयात नेले, मात्र तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्र फिरवत हल्लेखोर इसमाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. भरदिवसा घडलेल्या या हत्येच्या घटनेमुळे अंबरनाथ शहरात खळबळ उडाली आहे.

# महिलांसाठी तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारावे - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

## महिलांना औद्योगिक क्षेत्रात सक्षम करण्यावर भर

● मुंबई, राकेश गायकवाड :

महिलांना औद्योगिक क्षेत्रात सक्षम करण्यासाठी तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारण्याच्या प्रक्रियेस गती द्यावी. बाजारपेठ असलेल्या तालुकास्तरावर हे भवन उभारण्यात येणार असून, यामध्ये 'माविम'च्या जास्तीत जास्त महिला बचतगटांना व्यवसाय करण्याची संधी प्राप्त होणार असल्याचे महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी सांगितले. मंत्रालय येथील दालनात रोहा येथे



गारमेंट प्रकल्प कार्यान्वित करणे, तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारणे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे कामकाज, राज्य बालहक्क संरक्षण आयोग तसेच १०० दिवस कृती आराखड्याबाबत बैठक झाली. यावेळी विभागाचे सचिव डॉ.अनुपकुमार यादव, आयुक्त कैलास पगारे, 'माविम'च्या कार्यकारी संचालक वर्षा लटा, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शहा, विभागाचे सहसचिव वि. रा. ठाकूर, अवर सचिव सुनिल सरदार, उपसचिव आनंद भोंडवे आदिंसह अधिकारी उपस्थित होते. महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे म्हणाल्या की, श्रीवर्धन येथे सोलार फिश ड्राईंग प्रोजेक्ट अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण उद्यम विकास प्रकल्प राबविण्यात येणार आहे. पान २ वर

# कोकण रेल्वेच्या दोन गाड्यांचे डबे वाढले



● मुंबई, सचिन कदम :

कोकण रेल्वे मार्गावरून धावणाऱ्या दोन रेल्वेगाड्यांच्या संरचनेत बदल करण्यात आला असून दोन्ही रेल्वेगाड्यांचे प्रत्येकी दोन डबे वाढले आहेत. हजरत निजामुद्दीन-तिरुवनंतपुरम सेंट्रल – हजरत निजामुद्दीन त्रि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेस आणि हजरत निजामुद्दीन – मडगाव – हजरत निजामुद्दीन द्वि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला प्रथम श्रेणीचा वातानुकूलित डबा आणि तृतीय श्रेणीचा वातानुकूलित डबा असे दोन डबे कायमस्वरूपी जोडण्यात येणार आहेत. कोकण रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक १२४३२ हजरत निजामुद्दीन-तिरुवनंतपुरम सेंट्रल त्रि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला ४ फेब्रुवारीपासून तर, गाडी क्रमांक १२४३१ तिरुवनंतपुरम सेंट्रल- हजरत निजामुद्दीन त्रि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला ६ फेब्रुवारीपासून डबे जोडण्यात येतील. गाडी क्रमांक २२४१४ हजरत निजामुद्दीन मडगाव द्वि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला ७ फेब्रुवारीपासून तर, गाडी क्रमांक २२४१३ मडगाव- हजरत निजामुद्दीन द्वि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला ९ फेब्रुवारीपासून अतिरिक्त डबे जोडले जातील. पान २ वर

## सावंतवाडीतील थांबा प्रतिक्षेत

गाडी क्रमांक १२४३२/१२४३१ हजरत निजामुद्दीन – तिरुवनंतपुरम सेंट्रल – हजरत निजामुद्दीन त्रि-साप्ताहिक राजधानी एक्स्प्रेसला सावंतवाडी स्थानकावर पूर्वी थांबा होता. मात्र वक्तशीरपणा वाढवण्यासाठी करोना काळात हा थांबा रद्द केला. परंतु, अद्याप तो पुन्हा सुरू करण्यात आलेला नाही.

# नवीन महाबळेश्वरमध्ये आणखी २९४ गावांचा समावेश

## सातारा, जावळी, पाटणमधील गावांचा प्रस्ताव सरकारकडे



● सातारा, दिगंबर जाधव:

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणाच्या शेजारीच कोयना बॅकवॉटरला लागून असलेल्या नवीन महाबळेश्वर गिरिस्थान प्रकल्पात नव्याने २९४ गावांचा समावेश करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने राज्य सरकारकडे मंजुरीसाठी सादर केला आहे. मंजुरी मिळाल्यास सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, पाटण, सातारा, जावळी या तालुक्यांतील ५२९ गावांसाठी एमएसआरडीसी नियोजन प्राधिकरण म्हणून काम करेल.

सातारा जिल्ह्यातील २३५ गावांतील ११५३ चौ. किमी क्षेत्रफळावर हे गिरिस्थान उभारण्यासाठी प्रारूप विकास आराखडा यापूर्वीच नागरिकांच्या सूचना, हरकतींसाठी एमएसआरडीसीने जाहीर केला आहे.

तो लवकरच अंतिम केला जाईल. या २३५ गावांमध्ये रोपवे, घाटमाथा रेल्वे, सायकल ट्रॅक, फ्युनिक्यूलर रेल्वे यांच्या विकासासह टुरिस्ट पॅराडाइज, पर्यटन आणि निसर्गसंपदा विकास केंद्र प्रस्तावित केले आहे. पान २ वर

## समावेश होणारी प्रमुख गावे

■ **सातारा :** यवतेश्वर, पाटेघर, रेवळी, परळी, नुणे, रोहोत, सरखाल, भांबावळी, चिंचणी, दरे बुद्रुक, धावडशी, कळंबे, कामठी तर्फे सातारा, कान्हेर, करंजे तर्फे परळी, आंबावडे बु. आगुडेवाडी.

■ **पाटण :** झाकडे, विहे, करंजवडे, येरफळे, तोरणे, साळवे, सांबूर, शिंदेवाडी, शिरशिंगे, तळीये, तेलेवाडी, नवजा, नाटोशी, निवडे, रोहिने, मारूळ हवेली, मुरूड, म्हावशी, मणेरी, गोकुळ तर्फे हेळवाक, जरेवाडी, काळगाव, डिचोळी, दिवाशी खुर्द, बाणपुरी, चाळकेवाडी.

■ **जावळी :** मालदेव, मेट इंदवली, मोहाट, पाली तर्फे तांब, ताकवली, तांबी, वासोटा, आडोशी, अंबेघर तर्फे मेढा, भणंग, गवडी, जुंगटी, खिरखंडी, कुसापुर, कुसवडे, माडोशी.

## संपादकीय

# स्वस्त चिनी “एआय” - जगाला पडू शकते महागडं

चिनी बनावटीच्या 'डीपसीक' एआय तंत्रज्ञानाने जागतिक धडाका दिला: तंत्रज्ञान, सुरक्षा आणि अर्थव्यवस्थेवरील प्रभाव चिनी बनावटीच्या डीपसीक एआय तंत्रज्ञानाने संपूर्ण जगाची झोप उडवण्याचे काम केले आहे. या तंत्रज्ञानाच्या आगमनाने अमेरिकेतील दिग्गज टेक कंपन्यांना मोठा फटका बसला आहे, परंतु खरा धोका राष्ट्रीय सुरक्षा आणि सायबर सुरक्षा संबंधित आहे. एआय सारखे अत्याधुनिक आणि प्रगत तंत्रज्ञान चीनसारख्या विस्तारवादी देशाच्या हाती गेले, तर संपूर्ण जगासाठी ही चिंतेची बाब ठरू शकते.

**चिनी डीपसीक तंत्रज्ञानाचा अमेरिकी शेअर बाजारावर प्रभाव**

डीपसीक तंत्रज्ञानाच्या सादरीकरणामुळे अमेरिकी शेअर बाजारात मोठी घसरण झाली. चिनी बनावटीच्या स्वस्त 'एआय' तंत्रज्ञानामुळे दिग्गज कंपन्यांचे समभाग कोसळले आणि त्यांना एकूण एक ट्रिलियन डॉलर्सचा फटका बसला. 'एनव्हिडिया', 'मायक्रोसॉफ्ट', 'गुगल'ची पेरेंट कंपनी 'अल्फाबेट' आणि 'डेल टेक्नॉलॉजीज' यांसारख्या कंपन्यांना या घटनेचा मोठा धक्का बसला. जगभरातील 'एआय' संबंधित कंपन्यांना याचा परिणाम जाणवला, आणि चिनी डीपसीक तंत्रज्ञानाच्या स्वस्त आणि प्रभावी स्वरूपामुळे तंत्रज्ञान क्षेत्रात एक मोठा बदल उभा राहिला आहे.

**स्पुटनिक क्षण आणि 'एआय' क्षेत्रातील नवीन युग**

डीपसीक तंत्रज्ञानाची तुलना 1960च्या दशकातील रशियाच्या स्पुटनिक प्रक्षेपणाशी केली जात आहे. जसे स्पुटनिकच्या प्रक्षेपणाने अंतराळ शर्यतीला प्रारंभ केला, तसेच डीपसीकने एआय क्षेत्रात एक नवीन युग सुरू केले आहे. अत्यल्प किमतीत सादर झालेले चिनी डीपसीक तंत्रज्ञान, 'चॅट जीपीटी'च्या महागडी आवृत्त्यापेक्षा अत्यंत स्वस्त ठरले आहे. 'चॅट जीपीटी'ला तयार करण्यासाठी 100 दशलक्ष डॉलर्स लागले, तर डीपसीक केवळ सहा दशलक्ष डॉलर्समध्ये तयार झाले आहे. यामुळे चिनी तंत्रज्ञानाच्या फायद्यामुळे अमेरिकेच्या प्रमुख कंपन्यांमध्ये असुरक्षितता आणि चिंता वाढली आहे.

**राष्ट्रीय सुरक्षा आणि सायबर सुरक्षा चिंतेचा विषय**

डीपसीक तंत्रज्ञानाच्या आगमनामुळे, एआयच्या क्षेत्रात चीनने अमेरिका आणि इतर देशांना मोठे आव्हान दिले आहे. 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करून, चीन गुप्त माहिती गोळा करू शकतो, ज्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा आणि सायबर सुरक्षा संबंधित चिंतेचे भडकले आहे. तसेच, या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे जगभरातील सरकारांना एआय अंमलबजावणीबाबत कठोर नियम लागू करण्याची गरज निर्माण होऊ शकते.

**भारतासाठी संधी आणि आव्हाने**

चीनने सादर केलेल्या डीपसीक तंत्रज्ञानामुळे, भारताच्या 'एआय' क्षेत्रात एक मोठी संधी निर्माण झाली आहे. भारताची तंत्रज्ञान क्षेत्रातील वाढती ताकद आणि संशोधन क्षमता, भारताला जागतिक 'एआय' लॅण्डस्केपमध्ये एक प्रमुख खेळाडू म्हणून स्थान मिळवू शकते. तथापि, भारताला चिनी तंत्रज्ञानाच्या धोक्यापासून डेटा आणि सायबरस्पेस सुरक्षित ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्या लागतील.


**अमेरिकेची भूमिका आणि भविष्यातील धोके**

चीनच्या डीपसीक तंत्रज्ञानामुळे अमेरिकेला एआय क्षेत्रातील वर्चस्व राखण्याचे आव्हान आहे. अमेरिकेला, चीनच्या प्रभावाला तोंड देण्यासाठी, त्याच्या तंत्रज्ञान कंपन्यांना आणि सरकारी संस्थांना अधिक सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. सायबर सुरक्षा धोके आणि तंत्रज्ञानातील स्पर्धा यामुळे, 'एआय' क्षेत्रासाठी जागतिक मानके स्थापन करण्याची आवश्यकता अधिक ठळकपणे समोर येते.

**निष्कर्ष**

चिनी डीपसीक एआय तंत्रज्ञानाची सादरीकरण एक महत्त्वाची घटना आहे, जी जागतिक पातळीवर तंत्रज्ञान, सुरक्षा आणि अर्थव्यवस्थेवरील चिंतेचा मुद्दा बनली आहे. या तंत्रज्ञानामुळे जागतिक सहकार्यात बदल येऊ शकतात आणि तंत्रज्ञानाच्या गैरवापराची संभाव्यता वाढू शकते. भारताने या नव्या आव्हानाला प्रतिसाद देण्यासाठी 'एआय' क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्याची आवश्यकता आहे. दुसरीकडे, अमेरिकेला चीनचा प्रभाव कमी करण्यासाठी सहकार्य आणि उपाययोजनांची आवश्यकता आहे, अन्यथा चिनी डीपसीक तंत्रज्ञानाच्या फायद्याचा जगाला मोठा परिणाम भोगावा लागू शकतो. **- अनिकेत घनश्याम भंकाळ**

## आजची चित्रोळी



लढवून पावन खिंड प्रभूनें
बाजी प्राणांची केली !
छत्रपतींच्या स्वप्नासाठीं
आहुती जीवाची दिली !!

**मुकुंद कुलकर्णी, मुंबई**

# तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची ज्येष्ठ नागरिकांची इच्छा शासन करणार पूर्ण “मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना”

राज्यातील सर्वधर्मीय ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांची तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत प्रति व्यक्ती 30 हजार रुपये इतके अनुदान प्रवास खर्चासाठी देण्यात येणार आहे. अधिक जाणून घेवू या... 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन' योजनेविषयी.. या योजनेमध्ये महाराष्ट्र राज्य व भारत देशातील प्रमुख तीर्थस्थळांचा समावेश या योजनेंतर्गत निर्धारित तीर्थस्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एकवेळ लाभ घेता येईल. प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रति व्यक्ती ३० हजार रुपये इतकी राहील. यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इ.सर्व बाबींचा समावेश असेल. या योजनेचा लाभ महाराष्ट्र राज्यातील ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिक यांना मिळू शकतो.

**पात्रता:-**

- लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
- वय वर्षे ६० व त्यावरील ज्येष्ठ नागरिक
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.

**अपात्रता:-**

- ज्यांच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे.
- ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ भारत सरकार किंवा राज्यी सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत असे सदस्य पात्र ठरणार नाहीत. तथापि अडीच लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणेद्वारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी पात्र ठरतील.
- ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार, आमदार आहे.
- ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड, कॉर्पोरेशन, उपक्रमाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक सदस्य आहेत.
- ज्यांच्याकडे चार चाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) त्याच्या कुटुंबातील सदस्यांचा नावावर नोंदणीकृत आहेत.
- कोणत्याही संसर्गजन्य रोगाने ग्रस्त जसे की टीबी, हदयाशी संबंधित श्वसन रोग, कोरोनरी अपुरेपणा, कोरोनरी थोम्बोसिस, मानसिक आजार, संसर्गजन्य कुष्ठरोग इ.
- अर्जासोबत, ज्येष्ठ नागरिकाला सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्याने पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (हे प्रमाणपत्र प्रवासाच्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा जास्त जुने नसावे)
- जे अर्जदार मागील वर्षामध्ये लॉटरीत निवडले गेले होते. परंतु प्रवासासाठी आमंत्रित करुनही त्यांनी प्रवास पूर्ण केला नाही. अशा माजी अर्जदारांना देखील या योजनेत पात्र ठरविले जाणार नाही.
- जर असे आढळून आले की अर्जदार, प्रवाशाने खोटी माहिती देऊन किंवा कोणतीही तथ्ये लपवून अर्ज केला आहे ज्यामुळे तो, तिला प्रवासासाठी अपात्र ठरते, तर त्याला, तिला कधीही योजनेच्या लाभांपासून वंचित ठेवता येईल. या योजनेच्या “पात्रता” व “अपात्रता” निकषामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्यास शासन मान्यतेने करण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे-**

- योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज.
- लाभार्थ्याचे आधार कार्ड, रेशनकार्ड
- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. (लाभार्थ्याचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्याचे १५ वर्षापूर्वीचे- रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र, प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.)
- सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नांचा दाखला (वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपर्यत असणे अनिवार्य) किंवा पिवळे/केशरी रेशनकार्ड
- वैद्यकीय प्रमाणपत्र
- पासपोर्ट आकाराचा फोटो.
- जवळच्या नातेवाईकांना मोबाईल क्रमांक
- या योजनेच्या अटी व शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र

**लाभर्थ्यांची निवड:-**

- प्रवाशाची निवड जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीद्वारे पुढील प्रक्रियेनुसार केली जाईल.
- जिल्हानिहाय कोटा निश्चित केला जाईल. विहित कोट्यापेक्षा जास्त अर्जाच्या उपलब्धतेवर लॉटरीद्वारे प्रवाशांची निवड केली जाईल.
- निवडलेला प्रवासी प्रवासाला न गेल्यास, प्रतिक्षा यादीत समाविष्ट असलेल्या व्यक्तीला प्रवासास पाठवता येईल.
- निवडलेले प्रवासी आणि प्रतीक्षा यादी विभागाच्या पोर्टलवर, जिल्हाधिकारी कार्यालयावर आणि समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि योग्य वाटेल अशा इतर माध्यमांद्वारे प्रसारित केली जाईल.
- फक्त निवडलेली व्यक्ती तीर्थयात्रेला जाऊ शकेल. तो/ती त्याच्यासोबत इतर कोणत्याही व्यक्तीला घेऊन जावू शकणार नाही.
- जर पती-पत्नीने स्वतंत्रपणे अर्ज केला असेल आणि एकाची लॉटरीत निवड झाली असेल आणि दुसऱ्या जोडीदाराची लॉटरीत निवड झाली नसेल. तर आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे त्यांना किंवा तिला यात्रेवर पाठविण्याचा निर्णय घेऊ शकतील.

**प्रवास प्रक्रिया:**

- जिल्हास्तरीय समितीने निवडलेल्या प्रवाशांची यादी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे सुपूर्द केली जाईल.
- निवडलेल्या प्रवाशांची यादी प्रवासासाठी अधिकृत टुरिस्ट कंपनी, एजन्सीला देण्यात देईल.
- नियुक्त अधिकृत टुरिस्ट कंपनी, एजन्सी टूरवरील प्रवाशांच्या गटाच्या प्रस्थानाची व्यवस्था करेल.
- प्रवाशांच्या प्रवासासाठी आवश्यक त्या सुविधा आणि कोणत्या सुविधा देण्यात याव्यात, याचा निर्णय राज्य शासन घेईल.
- सर्व यात्रेकरुंना प्रवासासाठी नियोजित स्थळी त्यांच्या स्वखर्चाने पोहोचावे लागेल.

**रेल्वे, बसने प्रवास:**

- जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समितीद्वारे प्रवाशाची सुरक्षा आणि आरोग्याशी संबंधित व्यवस्था सुनिश्चित केली जाईल.
- प्रवास सुरु झाल्यावर, प्रवासी प्रवासाच्या मध्यभागी असल्यास त्याला प्रवास सोडायचा असेल तर त्याला सरकारकडून तशी सुविधा दिली जाणार नाही आणि विशेष परिस्थितीत, प्रवास मध्य मार्गी सोडणे आवश्यक असल्यास, उपस्थित मार्गदर्शकाच्या परवानगीने स्वखर्चाने ते करण्याची परवानगी दिली जाईल.

**प्रवाशांचा गट:-**

- हा प्रवास केवळ एकत्रितपणे आयोजित केला जाईल. हा गट राज्य शासन किंवा शासनाने अधिकृत केलेल्या प्राधिकरण, एजन्सीद्वारे निश्चित केले जातील. शासनाने विहित केलेली किमान प्रवासी संख्या उपलब्ध झाल्यावरच कोणत्याही तीर्थदर्शनाचा प्रवास सुरु होईल.

**इतर लोकांच्या प्रवासावर निर्बंध:-**

- या योजनेंतर्गत प्रवासासाठी निवडलेल्या व्यक्तीलाच प्रवास करता येईल. प्रवासाचा खर्च देण्याची तयारी असली तरीही तो प्रवासात इतर कोणत्याही व्यक्तीला सोबत घेऊन जाऊ शकणार नाही. फक्त निवड केलेली व्यक्ती ट्रेन आणि वाहनामध्ये प्रवास करतील आणि प्रत्येक सीट, बर्थमध्ये फक्त एकच व्यक्ती प्रवास करेल.
- प्रवासादरम्यान प्रवाशाला कोणतीही निवड न केलेली व्यक्ती, इतर कोणतेही नातेवाईक किंवा लहान मूल इत्यादींना सोबत नेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**अतिरिक्त खर्चाबाबत:-**

- कोणत्याही प्रवाशाला प्रवासादरम्यान देवस्थान व विभागाने ठरवून दिलेल्या निकष, सुविधांकरिता इतर सुविधा घ्यायच्या असतील, तर त्यासाठी अतिरिक्त आर्थिक भाराची जबाबदारी संबंधित प्रवाशाची राहील.

**अर्ज करण्याची प्रक्रिया:-**

- योजनेचे अर्ज पोर्टल, मोबाईल ॲपद्वारे, सेतू सुविधा केंद्राद्वारे ऑनलाईन भरले जावू शकतात.
- पात्र नागरिकास या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करता येईल.
- ज्यांना ऑनलाईन अर्ज सादर करता येत नसेल, त्यांच्यासाठी अर्ज भरण्याची सुविधा सेतू केंद्रात उपलब्ध असेल.
- अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया विनामूल्य असेल.
- अर्जदाराने स्वत: उपरोक्त ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक असेल जेणेकरुन त्यांचा थेट फोटो काढता येईल आणि KYC करता येईल. यासाठी अर्जदाराने कुटुंबाचे पूर्ण ओळखपत्र (रेशनकार्ड), स्वत:चे आधार कार्ड आणणे आवश्यक आहे.
- अर्ज प्राप्त झाल्यानंतर, पात्र अर्जदारांची तात्पुरती यादी पोर्टल, ॲपवर जाहीर केली जाईल. पात्र अंतिम यादीतील अर्जदार दुर्दैवाने मयत झाल्यास त्या अर्जदाराचे नाव लाभार्थी यादीतून वगळण्यात येईल.
- मूळ अर्जदारासह जीवनसाथी, सहाय्यकाच्या प्रवाससंबंधीच्या तरतुदी:
- ७५ वर्षावरील अर्जदाराला त्याच्या जीवनसाथी किंवा सहाय्यकापैकी एकाला त्याच्यासोबत नेण्याची परवानगी असेल. परंतु अर्जदाराने त्याच्या अर्जात असे नमूद करणे आवश्यक आहे की, त्याचा जीवनसाथी, सहायक देखील प्रवास करण्यास इच्छुक आहे.
- ७५ वर्षावरील अर्जदाराच्या जोडीदाराचे वय ६० वर्षापेक्षा कमी असले तरीही प्रवासी सहाय्यक अर्जदारासोबत प्रवास करु शकेल.
- प्रवासात सहाय्यक घेण्याची सुविधा तेव्हाच उपलब्ध होईल जेव्हा अर्जदाराचे वय ७५ वर्षापेक्षा जास्त असेल आणि त्याने एकट्याने रेल्वे प्रवासासाठी अर्ज केला असेल. अर्जदाराचे वय ७५ वर्षापेक्षा कमी असल्यास सहाय्यकांना परवानगी दिली जाणार नाही.
- सोबत प्रवास करताना जोडीदारासोबत मदतनीस घेण्याची सोय नसेल. जर दोन्ही पती-पत्नीचे वय ७५ वर्षापेक्षा जास्त असेल आणि अर्जामध्ये मदतनीस नोंदणीकृत असेल, तर तो पाठविला जाऊ शकतो.
- सहाय्यकाचे किमान वय २१ वर्षे ते कमाल ५० वर्षे असावे. एखादा मदतनीस प्रवासात घेतल्यास, त्याला देखील त्याच प्रकारच्या सुविधा मिळतील ज्या प्रवाशाला परवानगी आहे. सहाय्यक शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रवासासाठी तंदुरस्त असावा.
- प्रवासी, पती-पत्नी आणि सहाय्यकांनी प्रवासाशी संबंधित सर्व मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे बंधनकारक असेल.
- या योजनेचे संनियत्रण व आढावा घेण्याकरिता राज्यस्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे. त्याचे अध्यक्ष सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री हे असतील तर उपाध्यक्ष राज्यमंत्री असतील. तर सहसचिव/उपसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग हे सदस्य सचिव असतील.

**जिल्हास्तरीय समितीची रचना:-**

**जिल्हास्तरीय समितीची रचना:-**

- **अध्यक्ष** - संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री
- **उपाध्यक्ष** - जिल्हाधिकारी
- **सदस्य** - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयुक्त, महानगरपालिका, मुख्यधिकारी, नगरपरिषद, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक
- **सदस्य सचिव** - सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण

**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**ठाणे**

पान १ वरून...

## राज्यभरातील खासगी रुग्णालयांची झडती

दरम्यान खासगी रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. यासाठी राज्यभरात जिल्हा स्तरावर पथकांची नियुक्ती करण्याचे आदेश आरोग्य विभागाने दिले आहेत. तपासणी करून आरोग्य सेवा आयुक्तांकडे दैनंदिन अहवाल सादर करण्यात येत आहे. आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून ५ जानेवारी २०२५ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका यांना ५ फेब्रुवारी २०२५ पर्यंतच्या काळात त्यांच्या कार्यक्षेत्रात नोंदणी झालेल्या सर्व खासगी रुग्णालयांच्या तपासण्या नियमाप्रमाणे कोणत्याही रुग्णालयाला नाहक त्रास न देता पूर्ण करण्याबाबतचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले होते.

## महिलांसाठी तालुकास्तरावर अस्मिता भवन...

या प्रकल्पांतर्गत बाजारभिमुख उद्योग विकास घटकांतर्गत शेती, शेतीसंलग्न व बिगर शेती आधारित उद्योगांना व नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

याचबरोबर रोहा येथील गारमेंट प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठीचे युनिट शहरासह ग्रामीण भागातही सुरू करण्यात यावे. प्रकल्पासाठी पात्र महिलांना योग्य प्रशिक्षण आणि मानधन मिळण्यासाठी पारदर्शक कार्यप्रणाली राबवावी. या प्रकल्पाच्या माध्यमातून जास्तीत जास्त महिलांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देशही तटकरे यांनी दिले.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ५० व्या वर्धापन दिनानिमत्त 'माविम' अंतर्गत असलेल्या जास्तीत जास्त बचतगटांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच 'माविम'चे कार्य ग्रामीण भागातही पोहोचावे यासाठी राज्यस्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्याचे निर्देश मंत्री कू. तटकरे यांनी दिले.

बालकांच्या हक्क आणि संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या राज्य बाल हक्क संरक्षण आयोगामधील रिक्त पदे कायम स्वरुपासह बाह्यस्त्रोत व कंत्राटी पद्धतीने भरण्यात येणार आल्याची माहिती सचिव अनुपकुमार यादव यांनी दिली.

राज्यस्तरीय बाल महोत्सवात साहित्यिक बालकांना व्यासपीठ उपलब्ध करावे

बालगृह व निरीक्षण गृहातील प्रवेशितांसाठी दरवर्षी राज्यस्तरीय बालमहोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. या महोत्सवाअंतर्गत जी बालके कथा, कविता लिहितात, ज्यांचे साहित्य प्रसिद्ध आहे अशा साहित्य क्षेत्राशी निगडीत असलेल्या बालकांसाठी विशेष व्यासपीठ या बालमहोत्सवात उपलब्ध करून देण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री कु. तटकरे यांनी दिले.

महिला व बालविकास मंत्री कु. तटकरे यांनी विभागातील विविध योजना आणि कामांचा तसेच १०० दिवस कृती आराखड्यासंदर्भात आढावा घेतला.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत गरोदर महिला, स्तनदा माता, बालके यांना घरपोच आहार, लाभार्थी बालकांचे ग्रोथ मॉनिटरींग, लाभार्थ्यांना गृहभेटीद्वारे मार्गदर्शन, पोषण विषयक जनजागृतीकरिता समुदाय आधारित कार्यक्रम, ग्राम बाल विकास केंद्र, नागरी बाल विकास केंद्र, अंगणवाडी केंद्रांना शौचालय, पिण्याच्या पाण्याची सोय, जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, भिक्षेकरींच्या कामाचा मोबदला, पिंक रिक्षा, लाडकी बहीण योजना, फिरते पथक यासंदर्भातही यावेळी आढावा घेण्यात आला.

## नवीन महाबळेश्वरमध्ये आणखी २९४ गावांचा...

त्यातून तेथे पर्यटनाला चालना देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

यापूर्वी नवीन महाबळेश्वर गिरिस्थानात समाविष्ट केलेल्या २३५ गावांच्या अधिसूचित क्षेत्रानजीक असलेल्या २९४ गावांचाही या प्रकल्पात नव्याने समावेश करण्यात येणार आहे. या २९४ गावांचे एकूण क्षेत्रफळ ९४४ चौ. किमी आहे.

हा प्रस्ताव मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. त्यातून या भागाचा नियोजनबद्धरीतीने विकास होण्यास मदत मिळेल, असे एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने नमूद केले.

या २३५ गावांचे एकूण क्षेत्र १,१५,३०० हेक्टर आहे. आता नव्याने समाविष्ट केल्या जाणाऱ्या २९४ गावांचे क्षेत्रफळ ९४,४०४ हेक्टर एवढे आहे. या नव्या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यास साताऱ्यातील ५२९ गावांतील २,०९,७०० हेक्टर क्षेत्रासाठी एमएसआरडीसी नियोजन प्राधिकरण असेल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## कोकण रेल्वेच्या दोन गाड्यांचे डबे वाढले

या वाढीव डब्यांमुळे या रेल्वेगाडीचे एकूण डबे २० वरून २२ होतील. दोन्ही गाड्यांच्या डब्यांची सुधारित रचना प्रथम श्रेणी वातानुकूलित २ डबे, द्वितीय श्रेणी वातानुकूलित ५ डबे, तृतीय वातानुकूलित १२ डबे, पन्ट्री कार १ आणि जनरेटर कार २ अशी असणार आहे.

**विदर्भ-कोकणाला जोडणारी विशेष रेल्वेगाडी**

'धारातीर्थ गडकोट मोहीम २०२५' निमित्त नवीन अमरावती ते वीर दरम्यान अनारक्षित विशेष गाड्या चालवणार येणार आहे. त्यामुळे विदर्भ आणि कोकणाला जोडणारी रेल्वेगाडी धावेल. मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ०११०१ विशेष रेल्वेगाडी नवीन अमरावती येथून ६ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता सुटेल आणि वीर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ७.४५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११०२ विशेष रेल्वेगाडी वीर येथून ११ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजता सुटेल आणि नवीन अमरावती येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १२.३० वाजता पोहोचेल. या रेल्वेगाडीला बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, नांदुरा, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, पनवेल, रोहा येथे थांबा असेल. या रेल्वेगाडीला १६ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ द्वितीय सीटिंगसह गार्ड ब्रेक व्हॅन अशी संरचना असेल. या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन अशी मध्य रेल्वे प्रशासनाकडून केले आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# मासवण नदीतून वसई विरारच्या जनतेला पाणी देणाऱ्या मासवण वासियांच्या घशाला कोरडच...

## पाण्यासाठी सचिन पिंपळे यांचे आजपासून बेमुदत उपोषण

**पालघर (सतीश सोनावणे) -** ७० किलोमीटर अंतरावर असलेल्या वसई विरार महानगरपालिकेला मासवण नदीतून पाणी पुरवठा केला जातो परंतु मासवण सहित लघतचे पाच गावाच्या नागरिकांच्या घशाला कोरड मात्र आजही आहे.




गेल्या पंधरा वर्षांपासून पाण्याच्या प्रतिक्षेत असलेले मासवण , लोवरे, वसरोली , खरशेत, निहे हे पाच गाव आजही पाण्यावाचून वंचित असून करोडो रुपये खर्च करून देखील योजना पूर्ण होत नसेल तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हर घर जल हि महत्वकांक्षी योजना कागदावरच राबवली जात आहे का असा आरोप उपोषणकर्ते सचिन पिंपळे यांनी केला आहे.

मासवण पाणी पुरवठा योजनाचे काम मे. जयदीपराज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा लि. या कंपनीला देण्यात आलेले असून २०१८-१९ साली राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत या कामासाठी ५,४६,१२,०२० रूपये खर्च करून देखील हि योजना पूर्ण करण्यासाठी अपयशी ठरलेले जिल्हा पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी याच योजनेवर सन २०२१-२२ साली ४,५२,४६,१४५ रूपये खर्च करून जल जीवन मिशन योजना राबविण्यात आली तरीही मासवण सहित पाच गावांना पाणी पुरवठा करणे जिल्हा पाणीपुरवठा अधिकाऱ्यांना अपयश आले आहे. दरम्यान सदर पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याचे काम काळा यादीत समाविष्ट असलेला ठेकेदार मितेश पारेख यांच्याकडून सह ठेकेदार म्हणून मुख्य ठेकेदार मे. जयदीपराज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा लि कंपनीचे मालक आर एल गुले करून घेत असून मितेश पारेख यांनी यापूर्वी अभियंत्यांना हाताशी धरून अनेक योजना कागदावरच राबवली असल्याचे आरोप केला जात आहे.

■ या उपोषणात मासवण, लोवरे, वरसोली, खरशेत, निहे गावातील सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामस्थ तसेच नागझरी - मासवण संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

■ शास्वत स्त्रोत असलेल्या मासवण नदीतून वसई विरार येथील नागरिकांची तहान भागवली जाते परंतु करोडो रुपये खर्च करून देखील हाकेच्या अंतरावर असलेल्या गावांना पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे. पाणीपुरवठा अभियंत्यांच्या निदर्शनास हि बाब आणून देखील पिण्यासाठी पाणी मिळत नसल्यामुळे उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे.

**सचिन जगदीश पिंपळे - मा पंचायत समिती सदस्य पालघर**

# कोणत्याही जाती धर्माच्या व्यक्तींची नाहक बदनामी करणाऱ्यास तात्काळ शासन व्हावे : चारुदत्त आफळे

## ब्राह्मण संमेलनात झाला ठराव; मुख्यमंत्र्यांना पाठवणार निवेदन

**कल्याण (आकाश कांबळे) :** कोणत्याही जाती धर्माच्या व्यक्तींबद्दल कोणतेही पुरावे नसताना मानहानी करणारे वक्तव्य करणाऱ्या व्यक्तीविरोधात राज्य शासनाने त्वरित कठोर शासन करण्याची भूमिका घ्यावी वेळप्रसंगी अशा व्यक्तींना तुरुंगात धाडावे, जेणेकरून कोणाचाही अपमान होणार नाही. राष्ट्रपुरुष, सन्माननिय व्यक्ती तसेच सामान्यांचा मान राखला जाईल अशी जनहितावह सर्वसामावेशक भूमिका घेणे ही काळाची गरज आहे. ब्राह्मण महासंघ, डोंबिवली या संस्थेने ती जबाबदारी घेऊन तशी सूचना राज्य शासनाला करावी असे मत प्रख्यात राष्ट्रीय कीर्तनकार, व्याख्याते ह.भ.प. चारुदत्त आफळे यांनी रविवारी डोंबिवलीत केले. ब्राह्मण महासंघाने शहरातील सर्व संलग्न ब्राह्मण ज्ञाती संस्थांच्या सहकार्याने ब्राह्मण संमेलन- २०२५ भरवले होते. डोंबिवली येथील टिळकनगर शाळेच्या मैदानात ब्राह्मण संमेलन संपन्न झाले, त्यावेळी ह. भ प. चारुदत्त आफळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




त्यानिमित्ताने संस्थेने स्वरोत्सव हा गायक, कवी किरण फाटक यांनी त्यांच्यासह ५ कलाकारांच्या साथीने गाण्याचा कार्यक्रम सादर केला. ब्राह्मण महासंघ, डोंबिवली संस्थेचे अध्यक्ष मानस पिंगळे, कार्यवाह अनघा बोंद्रे, उपाध्यक्ष आणि संमेलन कार्यक्रम प्रमुख अनिकेत घमंडी, उपाध्यक्ष निलेश वीरकर, कोषाध्यक्ष जयंत कुलकर्णी, सह कोषाध्यक्ष उल्हास दाते आदींसह इतर कार्यकारिणी सदस्यांनी त्याच्या आयोजनाची जबाबदारी घेतली होती. ब्राह्मण ज्ञाती संस्थाध्यक्ष आणि शेकडो ब्राह्मण नागरिक त्यावेळी उपस्थित होते.

# राज्य युवा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज करावेत

**ठाणे (सम्यक कासारे):-** राष्ट्र व राज्य निर्माणामध्ये युवकांची महत्वपूर्ण भूमिका असून मोठ्या संख्येने युवा वर्ग / संस्था राज्यात सामाजिक कार्य करीत आहेत. युवांमध्ये असलेल्या सुप्तगुणांना वाव देणे, त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याला प्रोत्साहन देणे, त्याचा गुणगौरव करणे आवश्यक आहे. राज्याच्या युवा धोरणांतर्गत युवांच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यासाठी राज्य युवा पुरस्कार शासन निर्णय दि.१२ जानेवारी २०१३ नुसार देण्यात येतात. सन २०२३-२४ या वर्षात राज्यस्तरावर राज्य युवा पुरस्कार क्रीडा विभागाच्या क्षेत्रीय विभागस्तर नुसार प्रत्येक विभागातील १ युवक, १ युवती व १ नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप युवक-युवती यांना रोख रु.५० हजार व संस्थेस रु.१ लाख तसेच गौरवपत्र, सन्मानचिन्ह असे राहणार आहे. राज्य युवा पुस्कारासाठी युवक अथवा युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था यांची गत तीन वर्षांमध्ये केलेल्या कामगिरीचे मूल्यांकन विचारात घेण्यात येणार असून राज्य युवा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय किंवा https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. तरी, जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवा व युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांनी पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी केले आहे. उर्वरित माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असून अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कोर्ट नाका, ठाणे दूरध्वनी: ०२२-२५३६८७५५येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांनी केले आहे.

# कल्याण-शिळफाटा रस्त्यावर शुक्रवारपासून हलक्या वाहनांसाठी पर्यायी रस्ते

## जड, अवजड वाहनांच्या वाहतुकीला चार ठिकाणी बंदी



**कल्याण (विवेक गुंजाळ) –** कल्याण-शिळफाटा रस्त्यावर निळजे रेल्वे उड्डाण पूल येथे समर्पित जलदगती मालवाहू रेल्वे मार्ग विभागातर्फे उड्डाण पुलाच्या पुनर्बांधणीचे काम शुक्रवारी (ता. ६) रात्री १२ वाजता सुरू करण्यात येणार आहे. हे काम सोमवारी (ता.१०) रात्री १२ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या पाच दिवसांच्या कालावधीत शिळफाटा रस्त्यावरून पलावा जंक्शनकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक वाहतूक विभागातर्फे रेल्वे विभागाकडून करण्यात आलेल्या मागणीवरून बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती कोळसेवाडी वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन सांडभोर यांनी दिली.

या बंदच्या काळात शिळफाटा रस्त्यावरून धावणाऱ्या हलक्या वाहनांसाठी पर्यायी रस्ते वाहतुकीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जड, अवजड वाहनांचे चार ठिकाणचे प्रवेश बंद करून त्यांना पर्यायी वळण रस्ते मार्ग उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वाहतूक विभागाने सुचविलेल्या सूचनेप्रमाणे वाहन चालकांनी पाच दिवस वाहतूक करावी, असे आवाहन वरिष्ठ निरीक्षक सांडभोर यांनी केले आहे.

शिळफाटा रस्त्यावर काटई ते खिडकाळी दरम्यान अगोदरच अरूंद रस्ता, दोन्ही बाजुच्या रस्ते सीमारेषांची कामे शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदला न मिळाल्याने रखडली आहेत. या रस्त्यावर मेट्रो उभारणीची कामे सुरू आहेत. शिळफाटा रस्ता सतत वाहतूक कोंडीत अडकलेला असतो. आता येणारे पाच दिवस निळजे रेल्वे उड्डाण पूल पुनर्बांधणीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. शिळफाटा रस्त्यावर अभूतपूर्व वाहन कोंडी होण्याचा विचार करून वाहतूक विभागाने पर्यायी रस्ते मार्ग प्रवाशांना उपलब्ध करून दिले आहेत. अत्यावश्यक सेवेतील रुग्णवाहिका, अग्निशमन, पोलीस अशा वाहनांना या बंदतून वगळण्यात आले आहे.

### हलक्या वाहनांसाठी पर्यायी रस्ते

■ नवी मुंबई भागातून डोंबिवली, कल्याण दिशेने येणाऱ्या दुचाकी स्वार, मोटार वाहन चालकांनी कल्याण फाटा येथे दत्त मंदिरा मागील शिळ गाव मार्गे दिवा, आगासन रेल्वे फाटक, दिवा-संदप रस्ता मार्गे, घारिवली, मानपाडा रस्त्याने शिळफाटा येथे यावे.

■ मुंबई, ठाणे शहरांतून डोंबिवली, कल्याणच्या दिशेने येणाऱ्या मोटार कार, दुचाकी स्वारांनी मुंबई-नाशिक महामार्ग, माणकोली उड्डाण पूल, मोठागाव-डोंबिवली मार्गाचा वापर करावा. किंवा नाशिक महामार्ग-रांजनोली, भिवंडी बाह्यवळण रस्ता, कोनगाव-दुर्गाडी रस्त्याच्या वापर करावा.

■ कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ शहरांतून नवी मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मोटार, दुचाकी स्वारांनी चक्कीनाका, मलंग रस्ता, नेवाळी नाका येथून उजवे वळण घेऊन पाईपलाईन रस्ता, खोणी नाका, निसर्ग हॉटेल, तळोजा रस्ता एमआयडीसी रस्तेमार्गे इच्छित स्थळी जावे.

■ कल्याण, डोंबिवलीतून ठाणे, मुंबईत जाणाऱ्या मोटार, दुचाकी स्वारांनी दुर्गाडी कोनगावमार्गे मुंबई-नाशिक महामार्गाने किंवा डोंबिवलीतून माणकोली पूल मार्गे इच्छित स्थळी जावे.

### जड वाहने प्रवेश बंद

■ मुंब्रा, कल्याण फाटा येथून कल्याण, डोंबिवलीच्या दिशेने येणाऱ्या वाहनांना कल्याण फाटा येथे प्रवेश बंद असेल. ही जड, अवजड वाहने मुंब्रा बायपास, खारेगाव टोलनाका येथून इच्छित स्थळी जातील.

■ कल्याणकडून मुंब्रा, कल्याण फाटा जाणाऱ्या सर्व जड, अवजड वाहनांना काटई चौक (बदलापूर फाटा) येथे प्रवेश बंद असेल. ही वाहने खोणी नाका, तळोजा एमआयडीसी रस्त्याने जातील.

■ नवी मुंबई, तळोजा भागातून काटई चौककडे जाणाऱ्या सर्व जड वाहनांना खोणी नाका निसर्ग हॉटेल येथे प्रवेश बंद. ही वाहने निसर्ग हॉटेल येथे उजवे वळण घेऊन नेवाळी नाकामार्गे इच्छित स्थळी जातील.

■ अंबरनाथ, बदलापूर येथून काटई चौक येथे जाणाऱ्या सर्व जड वाहनांना खोणी निसर्ग हॉटेल येथे प्रवेश बंद. ही वाहने तळाजो एमआयडीसी रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

# डोंबिवलीतील रुणवाल गार्डन ते वाशी, डोंबिवली रेल्वे स्थानक बस फेऱ्या सुरू



**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** डोंबिवली पूर्वेतील कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील रुणवाल गार्ड माय सिटी ते डोंबिवली रेल्वे स्थानक आणि रुणवाल गार्डन ते वाशी नवी मुंबई अशा बस फेऱ्या कल्याण डोंबिवली पालिका परिवहन उपक्रमाच्या सहकार्याने सुरू करण्यात आल्या आहेत. रुणवाल गार्डनमधील रहिवासी, ज्येष्ठ नागरिकांच्या मागणीवरून या बस सुरू करण्यात आल्या आहेत. सकाळच्या गर्दीच्या वेळेत दोन फेऱ्या, संध्याकाळी दोन फेऱ्या असे या बसफेऱ्यांचे नियोजन आहे. डोंबिवली रेल्वे स्थानकापासून ते रुणवाल गार्डन स्वतंत्र बसची सुविधा नसल्याने या गृहसंकुलातून प्रवास करणाऱ्या नोकरदार, ज्येष्ठ नागरिक, वृध्द, शाळकरी विद्यार्थी यांना रिक्षा सेवेवर अवलंबून राहावे लागत होते. डोंबिवली रेल्वे स्थानकापासून रुणवाल गार्डन गृहसंकुलात येण्यासाठी रिक्षा चालक सहजासहजी तयार होत नव्हते. त्यामुळे प्रवाशांची दररोज कुचंबणा होत होती. तसेच, रुणवाल गार्डन गृहसंकुलातून अनेक रहिवासी नवी मुंबईत नोकरी व्यवसायासाठी जातात. त्यांना केडीएमटी, नवी मुंबई परिवहन सेवेच्या बसवर अवलंबून राहावे लागत होते. नवी मुंबईत जाणाऱ्या या बस कल्याण, डोंबिवली शहरातूनच प्रवाशांची खचाखच भरून येत होत्या. रुणवाल गार्डनमधील नोकरदारांना या बसना लोंबकळत प्रवास करावा लागत होता. रुणवाल गार्डनमधून प्रवास करताना होणाऱ्या त्रासाची माहिती रहिवासी, ज्येष्ठ नागरिकांनी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांना दिली होती. आमदार मोरे यांनी ही माहिती कल्याणचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांना दिली. खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी याविषयी पालिका आयुक्त डॉक्टर इंदुराणी जाखड यांच्याशी चर्चा करून रुणवाल गार्डनमधील रहिवाशांची कैफियत त्यांना सांगितली. आयुक्त डॉक्टर जाखड यांनी रुणवाल गार्डनमधील रहिवाशांच्या सोयीसाठी डोंबिवली रेल्वे स्थानक ते वाशी बस फेऱ्या सुरू करण्यासाठी कल्याण डोंबिवली पालिकेच्या बस उपलब्ध करून देण्याचे आश्वास दिले. रुणवाल गार्डनमध्ये सुमारे तीन हजार कुटुंब वास्तव्यास आहेत. या संकुलात सुमारे साडे सहा हजार लोक वस्ती आहे. आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे रुणवाल गार्डन ते डोंबिवली रेल्वे स्थानक, रुणवाल गार्डन ते वाशी बस फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. आमदार राजेश मोरे, शिंदे शिवसेनेचे पदाधिकारी महेश पाटील, दत्ता वझे, रुणवाल गार्डनमधील रहिवासी यांच्या उपस्थितीत शनिवारी या बस फेऱ्यांचे उद्घाटन करण्यात आले.

■ रुणवाल गार्डनमधील सुमारे साडे सहा हजार लोकांची स्वतंत्र बससेवेची मागणी होती. खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या सहकार्याने ही बससेवा रुणवाल गार्डनमधील रहिवाशांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रवाशांचा या बसना चांगला प्रतिसाद मिळाला तर या फेऱ्या वाढविण्यात येतील.

**-राजेश मोरे, आमदार, कल्याण ग्रामीण.**

# समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी समाजाचे संघटीत राहणे गरजेचे - शंकर बाईत

## पती नसलेल्या स्त्रीयांना धार्मिक कार्यक्रमात सन्मानपूर्वक वागणूक देण्याचे आवाहन

**ठाणे (रोहित जैसवार) :** हक्क व अधिकार हे मागून मिळत नाही तर संघटीत पणे लढा द्यावा लागतो. त्यासाठी समाजाने संघटीत राहणे गरजेचे आहे असे विधान कुणबी समाजोन्नती संघ मुंबई तालुका शाखा-खेडचे अध्यक्ष शंकर बाईत यांनी केले. दिवा साऊथ इंडियन इंग्लिश स्कुल येथे कुणबी समाजाचा स्नेह मेळावा व हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी श्री बाईत बोलत होते.यावेळी या कार्यक्रमास कुणबी समाजोन्नती संघाचे संघ कार्यकारणी सदस्य नवनीत पिंपरे, कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा खेड ग्रामीणचे सचिव सचिन गोवळकर,सुधीर वैराग,पांडूरंग पाष्टे, मुंबई शाखा खेडचे सुरेश मांडवकर, संदिप दोडेकर,रुपेश तांबट,संजय जाधव,दिनेश मांडवकर, मुंबई कुणबी युवाचे मंगेश मांडवकर, प्रविण शिबे,विलास मुकणाक,शैलेश शिगवण,पंकज तांबट,परशुराम निर्मळ,बबन भागणे, शिवाजी बाईत, जयेश हूमणे तसेच खेड तालुक्यातील मुंबई, ठाणे, दिवाचे कुणबी बांधव व भगिनी दिवा वासीय बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना श्री. बाईत म्हणाले की, कुणबी समाज हा बहुसंख्येने असलेला समाज आहे. तो विखुरलेला असल्याने त्याच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत आहे. या स्नेह मेळावाच्या माध्यमातून आपल्या विखुरलेला बांधवांनी संघटित होऊन एकत्र करुन एकजुटीने काम करणे आवश्यक आहे,त्यामध्ये एकमेकांची सुख दुख समजतात, त्यासाठी असे स्नेह मेळावे आयोजित करणे आवश्यक आहे. यातूनच समाजातील प्रश्नांवर विचारविनिमय करता येतो.कुणबी समाजाला जातीचा दाखला मिळण्यासाठी अनेक अडचणी येत होत्या त्या अडचणी कुणबी समाजोन्नती संघाच्या माध्यमातून सोडवण्यात आल्या आहे.




# १० कोटींच्या खंडणी प्रकरणात माजी नगरसवेक स्वप्निल बांदेकरसह चौघांना अटक

**वसई (सुचिता सोनावणे) :** एका बांधकाम व्यावसायिकाकडे १० कोटींची खंडणी मागितल्याप्रकरणी वसई विरार महापालिकेचे ठाकरे गटाचे माजी नगरसेवक स्वप्निल बांदेकर यांच्यासह ४ जणांना अटक करण्यात आली आहे. शनिवारी रात्री खंडणीच्या रकमेतील १५ लाखांचा पहिला हफ्ता घेताना सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. आरोपींविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०८(२), ३०८ (३) ३०८ (४), ३५२, ३५१(२) ३(५) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बांधकाम व्यावसायिक आकाश गुप्ता (३४) यांचा वरळीत झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पाविरोधात शिवसेनेचे (ठाकरे गट) माजी नगरसेवक स्वप्निल बांदेकर यांनी विविध ठिकाणी तक्रारी केल्या होत्या. हे प्रकरण मिटविण्यासाठी बांदेकर यांनी १० कोटींची खंडणी मागितली होती. नंतर तडजोड होऊन खंडणीची रक्कम दीड कोटी रुपये ठरली. त्या खंडणीच्या रकमेतील १५ लाखांचा पहिला हप्ता घेण्यासाठी बांदेकरच्या वतीने हिमांश शहा (४५) आला होता. शनिवारी रात्री मिरा रोड येथील बनाना लिफ हॉटेलमध्ये नवघर पोलिसांनी सापळा लावून शहा याला अटक केली. त्यानंतर नालासोपारा येथून माजी नगरसेवक स्वप्निल बांदेकर तसेच त्याचे अन्य दोन साथीदार किशोर काजरेकर आणि निखिल बोलार यांना अटक केली, अशी माहिती नवघर पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल तळेकर यांनी दिली.सर्व आरोपींना रविवारी न्यायालयात हजर केले असता ५ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. स्वप्निल बांदेकर हे वसई विरार महापालिकेत २०१५ ते २०२० या काळात शिवसेनेचे नगरसेवक होते. शिवसेनेच्या बंडानंतर ते ठाकरे गटातच राहिले.मुंबईत राहणारे तक्रारदार आकाश गुप्ता (३४) हे बांधकाम व्यावसायिक आहेत. गुप्ता यांच्या कंपनीत हिमांशू शहा (४५) हा भागीदार आहे. गुप्ता यांच्या चिंतहररस चिंतपुरणी एलएलपी रिॲल्टर्स कंपनीला वरळी आदर्शनगर येथील दर्शन सोसायटीच्या पुनर्विकासाचे काम मिळाले आहे.



# अंकिता वालावलकरने राज ठाकरेंना दिलं लग्नाचं निमंत्रण

'कोकण हार्टेड गर्ल' या नावाने लोकप्रिय असणारी कोकण कन्या अंकिता वालावलकर 'बिग बॉस मराठी'मुळे अधिक प्रसिद्धी झोतात आली. अंकिता हिची सध्या लगीनघाई सुरु आहे. लवकरच ती मराठी मनोरंजन विश्वातील संगीतकार कुणाल भगत याच्याशी लग्न करणार आहे. लग्नाचं आमंत्रण देण्यासाठी अंकिता आणि कुणाल हे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीला 'शिवतीर्थ'वर पोहचले.



अंकिता आणि कुणालनं राज ठाकरेंना लग्नाचं निमंत्रण दिलं आहे. दोघांनीही इन्स्टाग्रामवर राज ठाकरे यांच्यासोबतचा फोटो शेअर केलाय. यामध्ये राज ठाकरेंसह त्यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे देखील पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे अंकिता वालावलकरने सर्वात आधी लग्नाची बातमी राज ठाकरेंनाच सांगितली होती. एका व्हिडीओच्या माध्यमातून तिने सांगितलं होतं की, "तुम्ही सर्वांनी 'बिग बॉस'च्या घरातील माझा प्रवास पाहिला. मी खूप जास्त भावनिक मुलगी आहे. जेव्हा आमचं लग्न ठरत होतं तेव्हा एक गोष्ट तुम्हाला सांगते. आमच्या दोघांचे बरेच गुण जुळतात, त्यापैकीच एक गुण जुळला तो म्हणजे आमच्या भावना.

त्या भावनांपैकी एक महत्त्वाची व्यक्ती म्हणजे माननीय राज ठाकरे जेव्हा 'येक नंबर' या चित्रपटाचं काम चालू होतं आणि कुणाल या चित्रपटासाठी काम करत होता. तेव्हा मला खूपच आनंद झाला होता. यादरम्यानच आम्ही राज ठाकरेंना सगळयात आधी आमच्या लग्नाची बातमी सांगितली होती. राज साहेबांना आम्ही गुढीपाडव्यालाच लग्नाबद्दल सांगितलं होतं. पण, त्यानंतर 'बिग बॉस'मुळे सगळ्या गोष्टी पुढे ढकलल्या गेल्या."

अंकिता वालावलकरने लग्नाची तारीख अद्याप जाहीर केलेली नाही. पण माहितीनुसार, अंकिता मार्च महिन्यात कुणालबरोबर लग्नगाठ बांधून आयुष्याच्या नव्या प्रवासाला सुरुवात करणार असल्याचं म्हटलं जातं आहे. अंकिताचा होणारा पती कुणाल संगीतकार आहे. बऱ्याच चित्रपटातील गाणी आणि मालिकांचं शीर्षकगीत त्याने संगीतबद्ध केलं आहे.

# तेजश्री प्रधानच्या एक्झिटनंतर 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला बसला मोठा फटका

मराठी मालिकाविश्वातील आघाडीची अभिनेत्री म्हणजे तेजश्री प्रधान. तेजश्रीने आपल्या सहजसुंदर अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं आहे. त्यामुळे तिची कोणतीही भूमिका असो, ती सुपरहिट होतेच. जान्हवी असो, शुभ्रा असो किंवा मुक्ता तिची प्रत्येक भूमिका प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली आहे. पण, काही दिवसांपूर्वी तेजश्री प्रधानने खूप मोठा निर्णय घेतला. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेली 'स्टार प्रवाह' वाहिनीवरील 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला रामराम केला. तिच्या या अचानक झालेल्या निर्णयामुळे चाहत्यांना धक्काच बसला.

अभिनेत्री तेजश्री प्रधानने 'प्रेमाची गोष्ट' मालिका सोडण्यामागचं अद्याप कारण स्पष्ट केलेलं नाही. पण, 'प्रेमाची गोष्ट' मालिकेत तेजश्रीची जागा अभिनेत्री स्वरदा ठिगळेने घेतली आहे. आता मालिकेत मुक्ताच्या भूमिकेत स्वरदा




पाहायला मिळत आहे. पण तेजश्री आणि 'प्रेमाची गोष्ट' मालिकेच्या चाहत्यांनी अजूनही मुक्ता म्हणून स्वरदाला स्वीकारलेलं दिसत नाहीये. मालिकेच्या प्रत्येक प्रोमोवर 'जुन्या मुक्ताला परत आणा', 'तेजश्री पाहिजे होती', 'टीआरपी घसणार' अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांच्या पाहायला मिळत आहेत. आता तेजश्रीच्या एक्झिटनंतर 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला मोठा फटका बसल्याचं समोर आलं आहे.

# भरत येणार परत, आता थांबायचं नाय सिनेमाचं पोस्टर लॉंच

मराठी चित्रपट, मालिका तसेच नाट्यविश्वात आपल्या अभिनयाची जादूगिरी दाखवलेला भरत जाधव हा प्रेक्षकांचा लाडका अभिनेता आहे. लवकरच त्याचा नवा चित्रपट आपल्या भेटीला येतोय आणि या चित्रपटाचे नुकतेच मोशन पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या मातीतील एका प्रेरणादायी सत्यकथेवर हा चित्रपट आधारलेला आहे. ज्याची निर्मिती 'झी स्टुडिओज्', 'चॉक अँड चीज फिल्म्स' आणि 'फिल्म जॅझ'ने केली आहे. या चित्रपटाचे नाव 'आता थांबायचं नाय!' असे आहे. ज्याचे मोशन पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आले आहे.

आता थांबायचं नाय! या चित्रपटाचे मोशन पोस्टर टायटलप्रमाणेच कमाल आहे. वेगवान रस्त्यावरील एका भिंतीवर तीन ठसठशीत रंगांत लिहिलेले 'आता थांबायचं नाय!' हे शीर्षक पाहून लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळयांनाच स्फूर्ती येईल. या मोशन पोस्टरमधून ऐकू येणारे जादुई संगीत रसिकांना मंत्रमुग्ध करत कमालीचे आकर्षण तयार करीत आहे.

एकापेक्षा एक दर्जेदार मराठी चित्रपट महाराष्ट्रातील रसिकांच्या मनामनात आणि घराघरात रुजवणाऱ्या 'झी स्टुडिओज्'ची प्रस्तुती असलेली ही या वर्षातील सर्वात मोठी घोषणा आहे. 'झी स्टुडीओज् मराठी'चे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर यांनी नुकतीच या चित्रपटाची घोषणा केली आहे.

**जबरदस्त कलाकारांची फौज**

'झी स्टुडीओज्', 'चॉक अँड चीज फिल्म्स' आणि 'फिल्म जॅझ' निर्मित






'आता थांबायचं नाय!' या चित्रपटाचे दिग्दर्शन लोकप्रिय अभिनेते शिवराज वायचळ यांनी केले आहे. प्रेरणादायी सत्यकथेवर आधारित असलेल्या या चित्रपटात प्रमुख भुमिकांमध्ये लोकप्रिय अभिनेता भरत जाधव, सिद्धार्थ जाधव, ओम भुतकर, श्रीकांत यादव, पर्ण पेठे, प्रवीणकुमार डाळिंबकर, प्राजक्ता हनमघर, किरण खोजे यांसह एका खास भूमिकेत रोहिणी हट्टंगडी आणि एका कर्तबगार, संवेदनशील अधिकाऱ्याच्या भूमिकेत आशुतोष गोवारीकर दिसणार आहेत.

**कधी रिलीज होणार?**

'झी स्टुडिओज्' प्रस्तुत 'आता थांबायचं नाय!' या चित्रपटाबाबत आणखी सांगायचं म्हणजे, चित्रपटाचे लेखन शिवराज वायचळ, ओमकार गोखले आणि अरविंद जगताप यांनी केले आहे. तर चित्रपटाच्या निर्मितीसाठी निर्माते उमेश के बन्सल(झी स्टुडिओज्), निधी परमार – हिरानंदानी(चॉक अँड चीज फिल्म्स'), क्रिएटिव्ह प्रोड्युसर – तुषार हिरानंदानी, धरम वालीया (फिल्म जॅझ) हे सर्व एकत्र आले आहेत. 'आता थांबायचं नाय!' ही सकारात्मक ऊर्जा घेऊन येणारी सत्यकथा १ मे पासून थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. अभिनेता भरत जाधवचा मोठा चाहता वर्ग आहे. मराठी रंगभूमी, मालिका तसेच चित्रपटांमध्ये भरतने साकारलेल्या भूमिकांना कायम प्रेक्षकांची वाहवाह मिळाली आहे. भरत शेवटचा 'लंडन मिसळ' या चित्रपटात दिसला होता. ज्यामध्ये ऋतुजा बागवे आणि रितिका श्रोत्रीदेखील मध्यवर्ती भूमिकेत होत्या. शिवाय माधुरी पवार, गौरव मोरेदेखील या चित्रपटात महत्वाच्या भूमिकेत होते. हा एक कॉमेडी जॉनर सिनेमा होता. यानंतर आता भरत पुन्हा एकदा नव्या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीसाठी सज्ज झाला आहे.

# 'प्रेमाची गोष्ट'मधील मुक्तानं खऱ्या आयुष्यात साजरी केली पहिली मकर संक्रांत



नुकताच वर्षातील पहिला सण मकर संक्रांत सर्वत्र साजरा झाला. मकर संक्रांतीनिमित्त अनेक नवविवाहित जोडपी काळे कपडे आणि हलव्याचे दागिने परिधान करून हा सण साजरा करतात. यंदा १४ जानेवारीला मकर संक्रांत होती. अशात अजूनही अनेक नवीन जोडपी हलव्याचे दागिने घालून हा सण साजरा करीत आहेत. यंदा सिनेविश्वातील अनेक कलाकारांनीही त्यांची पहिली मकर संक्रांत साजरी केली आहे. अशात 'प्रेमाची गोष्ट'मधील अभिनेत्री स्वरदा ठिगळेने नुकतेच तिच्या पहिल्या मकर संक्रांतीचे फोटो शेअर केलेत.

मराठी मालिका विश्वातील 'प्रेमाची गोष्ट' ही एक प्रसिद्ध मालिका आहे. या मालिकेनं फार कमी काळात प्रेक्षकांच्या मनात आपली छाप उमटवली आहे. त्यातील सर्वच कलाकार आपली भूमिका चोख बजावताना दिसत आहेत. या मालिकेत मुक्ता हे प्रमुख पात्र अभिनेत्री तेजश्री प्रधान साकारत होती. काही दिवसांपूर्वी तिने या मालिकेतून एक्झिट घेतली. त्यामुळे आता तिच्या जागी मुक्ताच्या भूमिकेत अभिनेत्री स्वरदा ठिगळे दिसत आहे. स्वरदानं फार कमी काळात मुक्ता या पात्राद्वारे पसंती मिळवली आहे.

आपल्या पहिल्या मकर संक्रांतीचे फोटो तिनं सोशल मीडियावर पोस्ट केलेत. त्यामध्ये ती पती सिद्धार्थसह सुंदर पोज देताना दिसत आहे. दोघांनीही काळ्या रंगाचे कपडे आणि हलव्याचे सुंदर दागिने घातले आहेत. फोटो शेअर करीत स्वरदाने यावर एक पोस्टही लिहिली आहे. "पारंपरिक हलव्याचे दागिने, समृद्धी, प्रेम व नवीन सुरुवात यांचे प्रतीक असलेली आमची पहिली मकर संक्रांत आम्ही एकत्र साजरी करीत आहोत. हा सुंदर विधी सूर्याचे मकर राशीतील संक्रमण दर्शवतो आणि आपल्या जीवनात सकारात्मकता व विपुलता आणतो. नवविवाहित जोडप्याप्रमाणे हे दागिने घालणं आणि हा सण साजरा करणं हे आपल्याला आपल्या मुळाशी, संस्कृतीशी आणि एकमेकांशी जोडणारं आहे. आज उंच उंच उडणाऱ्या पतंगांप्रमाणे आमचा प्रवास उज्ज्वल होवो!"

# 'बिग बॉस मराठी ५' चा थरार पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला!

मुंबई : कलर्स मराठी वाहिनीने सोशल मीडियावर घोषणा करत 'बिग बॉस मराठी ५' च्या पुन:प्रक्षेपणाची माहिती दिली आहे. १० फेब्रुवारीपासून दररोज दुपारी ३ वाजता हा लोकप्रिय शो प्रेक्षकांना पुन्हा पाहता येणार आहे. सध्या चर्चा आहे बिग बॉस मराठीच्या पाचव्या सिझनची. या सिझनची का चर्चा रंगण्या मागचं कारण म्हणजे या गाजलेल्या सिझनचे सर्व एपिसोड्स तुम्ही टीव्हीवर परत पाहू शकता. आता हा सिझन पुन्हा एकदा टेलिकास्ट होत आहे. यावेळी या सिझनची बरीच चर्चा होती, तेव्हा प्रेक्षकांसाठी या सिझनचा आनंद आता ते पुन्हा घेऊ शकतात. या सिझनमधील सर्वच एपिसोड हे गाजले होते.

'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या सीझनने प्रेक्षकांच्या मनात वेगळीच जागा निर्माण केली होती. तब्बल ७० दिवस चाललेल्या या रिॲलिटी शोमध्ये १७ स्पर्धकांनी भाग घेतला होता. यंदाच्या पर्वाचं सूत्रसंचालन लोकप्रिय अभिनेता रितेश देशमुखने केलं होतं. त्याच्या खास शैलीत दिले जाणारे 'भाऊचे धक्के' हा




शोच्या चर्चेचा मुख्य विषय ठरला होता. कोणाला समज दिली जाईल, कोणाची 'शाळा' घेतली जाईल, याची उत्सुकता प्रेक्षकांना कायम राहिली.

या पर्वात सुरुवातीपासूनच वाद आणि गोंधळ पाहायला मिळाले. सदस्यांमधील वाद, मैत्री, आणि खेळी-मेळीने या सीझनने प्रेक्षकांचे भरघोस मनोरंजन केले. काही स्पर्धक मोठ्या प्रमाणावर ट्रोल झाले, तर काहींनी प्रेक्षकांची मने जिंकली. विशेष म्हणजे, टीआरपीच्या बाबतीतही 'बिग बॉस मराठी ५' ने नवा इतिहास रचला. शोच्या एकूण लोकप्रियतेमध्ये रितेश देशमुखच्या 'भाऊच्या धक्क्या'ने मोठा वाटा उचलला.

शोमध्ये अनेक नवी नाती तयार झाली. कुणी खास मित्र झाले, तर कुणी भाऊ-बहीण म्हणून एकत्र आले. या आठवणी आजही चाहत्यांच्या मनात ताज्या आहेत. या पर्वाचा विजेता सूरज चव्हाण ठरला, तर अभिजीत सावंत उपविजेता आणि निक्की तांबोळी तिसऱ्या स्थानावर राहिली. आता हा धम्माल आणि रोमांच पुन्हा अनुभवायला मिळणार आहे! त्यामुळे पुन्हा एकदा तोच उत्साह, तीच धम्माल आणि 'भाऊचे धक्के' अनुभवण्यासाठी तयार राहा!

# 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचा धमाल टिझर भेटीला!

मुंबई : रियुनियन म्हणजे धमाल मस्ती. अशाच जबरदस्त बॅकबेंचर्स मित्रांच्या रियुनियनचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यात 'इकडे आड तिकडे विहीर','आगीतून फुफाट्यात','धरलं तर चावतंय सोडलं तर पळतंय', 'बुडत्याचा पाय खोलात', 'दुष्काळात तेरावा महिना' या म्हणींतून या बॅकबेंचर्सची मजेशीर ओळख ही करून देण्यात आली आहे. या म्हणींची भानगड आणि त्यामागची गंमत हे सगळं जाणून घ्यायचं असेल तर २८ फेब्रुवारीला चित्रपटगृहात येणारा 'चिकी चिकी बुबूम बुम' हा चित्रपट तुम्हाला पहावा लागेल.

शीर्षकापासून आपलं वेगळंपण अधोरेखित करणाऱ्या




'चिकी चिकी बुबूम बुम' या चित्रपटाचं काही दिवसांपूर्वीच एक मजेदार पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आले होते. या पोस्टरवरून चित्रपटाविषयी उत्सुकता अधिकच वाढली होती. त्यातच आता चित्रपटाचा धमाल टिझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या टिझरमध्ये दिसणारा पार्टीतला गोंधळ आणि सोबत स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहरे, प्राजक्ता माळी, प्रसाद महादेव खांडेकर, रोहित माने, प्रथमेश शिवलकर, प्रभाकर मोरे अशा कलाकारांची जमून आलेली उत्तम भट्टी काहीतरी धमाल घडवणार हे दाखवतोय. यासोबतच नम्रता संभेराव,वनिता खरात, सचिन गोस्वामी, ओंकार राऊत, प्रियदर्शनी इंदलकर, अभिजीत चव्हाण, निखिल रत्नपारखी, चेतना भट, ,निखिल बने, श्याम राजपूत, श्लोक खांडेकर, प्रमोद बनसोडे, ऐश्वर्या बडदे हे कलाकारही चित्रपटात धमाल आणणार आहेत.

नारकर फिल्म्स अँड एंटरटेनमेंट निर्मित, आयडियाज द एंटरटेनमेंट कंपनी प्रस्तुत आणि स्वर्ण पट कथा आणि प्रजाकार प्रोडक्शन्स यांच्या सहयोगाने येणाऱ्या 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसाद महादेव खांडेकर यांचे आहे. 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचे निर्माते सुनील नारकर असून सहनिर्माते सेजल दिपक पेंटर आणि प्रसाद महादेव खांडेकर आहेत. चित्रपटाचे लेखन प्रथमेश शिवलकर, प्रसाद महादेव खांडेकर यांचे आहे. छायांकन गणेश उतेकर यांचे तर संगीत रोहन रोहन यांचे आहे. धमाल मस्तीचा 'चिकी चिकी बुबूम बुम' प्रेक्षकांसाठी एक वेगळीच ट्रीट असणार आहे.

**मेष** – तुमच्या कामात प्रगती होईल, पण थोड्या धैर्याची आवश्यकता असू शकते. आपल्या आरोग्यावर लक्ष ठेवा.

**वृषभ** – आर्थिक फायदा होण्याची शक्यता आहे. तुम्ही तुमच्या कार्यात सातत्य ठेवल्यास ध्येयापर्यंत पोहचू शकाल.

**मिथुन** – प्रेमसंबंधात सुधारणा होईल. काही महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी संयमाची आवश्यकता आहे. आरोग्य जपा.

**कर्क** – मानसिक शांती लाभेल. आर्थिक बाबतीत चांगले परिणाम मिळतील. कौटुंबिक जीवनात आव्हाने असू शकतात.

**सिंह** – प्रेम आणि नातेसंबंधात सामंजस्य ठेवणे महत्त्वाचे आहे. महत्त्वाच्या कामामध्ये तुम्हाला खात्रीने यश मिळेल.

**कन्या** – आपल्या वैयक्तिक जीवनात थोडा ताणतणाव येऊ शकतो. व्यावसायिक बाबतीत सतर्क राहणे आवश्यक आहे.




**तुळ** – भावनिक आणि मानसिक संतुलन राखणे महत्त्वाचे आहे. प्रिय व्यक्तींसोबत वेळ घालवणे चांगले राहील.

**वृश्चिक** – कार्यक्षेत्रात थोडा संघर्ष होऊ शकतो. तुमचे मनोबल आणि निर्णयक्षमतेचा योग्य उपयोग करावा.

**धनु** – उत्तम व्यावसायिक संधी येऊ शकतात. नवीन ज्ञान मिळवण्याची संधी मिळेल. कुटुंबात आनंद नांदेल.

**मकर** – आर्थिक बाबतीत क्षुल्लक तणाव निर्माण होईल. अपेक्षित यशासाठी आपणास खूप मेहनत करावी लागेल.

**कुंभ** – आपल्या वैयक्तिक जीवनात प्रेम आणि विश्वास वाढेल. तुमच्या सहकाऱ्यांना पाठिंबा देणे महत्त्वाचे आहे.

**मीन** – मानसिक व शारीरिकदृष्ट्या चांगले परिणाम मिळू शकतात. कौटुंबिक बाबतीत किरकोळ समस्या येऊ शकतात.

# अफजलखानाचा कोथळा काढलेली वाघनखं नागपूरला रवाना

## साताऱ्यात पाच लाख शिवप्रेमींनी घेतलं दर्शन



**सातारा (दिगंबर जाधव) -** ऐतिहासिक प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखानाचा कोथळा काढलेली छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं गेली सात महिने साताऱ्यातील संग्रहालयात पाहण्यासाठी ठेवण्यात आली होती. ही वाघनखं नागपूरला रवाना झाली आहेत.

वाघनखांचा साताऱ्यात सात महिने मुक्काम- अफजलखानाचा कोथळा काढलेली छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक वाघनखं लंडनमधील व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममधून देशात आणण्यात आली आहेत. नागरिकांना पाहता यावीत म्हणून १९ जुलै २०२४ पासून वाघनखं साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात ठेवण्यात आली होती. तेव्हापासून सुमारे पाच लाख शिवप्रेमींनी वाघनखांचं दर्शन घेतलं.

वाघनखं बंदोबस्तात नागपूरकडे रवाना- साताऱ्यातील संग्रहालयातून वाघनखं रविवारी सकाळी नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयाकडे रवाना झाली. यावेळी व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियमचे ब्रिटिश अधिकारी आणि पुरातत्त्व विभागाचे विशेष पथक उपस्थित होते. वाघनखांचा हस्तांतरण सोहळा यावेळी पार पडला. वाघनखांच्या सुरक्षेसाठी विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

वाघनखांचा नागपुरात सात महिने मुक्काम - साताऱ्यातील वाघनखांचं प्रदर्शन संपलं आहे. आता नागपुरातील शिवप्रेमींना ही वाघनखं पाहता येतील. पुरातत्व विभागाच्या नियोजनानुसार १ फेब्रुवारी ते २ ऑक्टोबरपर्यंत नागपूर, ३ ऑक्टोबर ते ३ मे २०२६ पर्यंत कोल्हापूर येथील संग्रहालयात ही वाघनखं पाहण्यासाठी ठेवली जाणार आहेत.

वाघनखं इंग्लंडवरून देशात आणण्याचा निर्णय- छत्रपती शिवाजी महाराजांनी १६५९ मध्ये सातारा येथील प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी अफजल खानचा वध केला. त्यामुळे साताऱ्यात लोकांना पाहण्यासाठी वाघनखं ठेवण्यात आली आहेत. प्रतापगडचा विजय हा शिवाजी महाराजांच्या शौर्याचं प्रतिक मानलं जातो.

# भारतीय रेल्वेनं केलं स्वारेल ॲप लाँच, आयआरसीटीसी ॲप होणार बंद?

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** भारतीय रेल्वेनं त्यांचं नवीन ॲप लॉंच केलंय. या स्वारेल ॲपची चर्चा गेल्या वर्षापासून सुरू होती. स्वारेल ॲप गुगल प्ले स्टोअर आणि आयओएस वर उपलब्ध असेल. हे ॲप रेल्वेच्या विविध सेवांचा लाभ घेण्यासाठी एक-स्टॉप डेस्टिनेशन असेल. वापरकर्ते ॲपच्या मदतीनं आरक्षण करू शकतील आणि जनरल तिकिटे आणि प्लॅटफॉर्म तिकिटे देखील त्याद्वारे बुक करू शकतील. ट्रेन किती उशिरा धावत आहे किंवा ती वेळेवर पोहोचेल की नाही?, हे देखील तुम्हाला कळेल. केटरिंग सर्व्हिस म्हणजे खाण्यापिण्याची व्यवस्था असेल आणि रेल्वे मदतीचीही सेवाही या ॲपच्या माध्यमातून तुम्ही घेऊ शकता.

### स्वारेल ॲप

रेल्वेचं हे नवीन ॲप सध्या बीटा व्हर्जनमध्ये आहे. याचा अर्थ, सध्यासाठी, त्याचा प्रवेश फक्त डेव्हलपर्स आणि निवडक वापरकर्त्यांसाठी उपलब्ध आहे. सध्या हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर चाचणीसाठी उपलब्ध आहे. रेल्वे बोर्डाच्या एका अधिकाऱ्यानं सांगितले की, "फक्त १००० वापरकर्ते ते डाउनलोड करू शकतात. आम्ही प्रतिसाद आणि अभिप्रायाचं मूल्यांकन करू.

त्यानंतर, पुढील सूचनेसाठी डाउनलोडसाठी उपलब्ध करून दिलं जाईल." हे ॲप सेंटर फॉर रेल्वे इन्फॉर्मेशन सिस्टम्स (CRIS) ने विकसित केलं आहे. स्वारेल हे रेल्वेच्या सर्व सेवांसाठी एक प्रमुख ॲप असेल. याचा अर्थ असा की आयआरसीटीसी रेल कनेक्ट, आयआरसीटीसी ई-केटरिंग फूड ऑन ट्रॅक, रेल मदत, अनरिझर्व्ड तिकीट सिस्टम (यूटीएस) आणि नॅशनल ट्रेन इन्क्वायरी सिस्टम सारख्या वेगवेगळया ॲप्स आणि पोर्टलची आता गरज नसेल.

SPORT

# 'I Wanted To Go...': MS Dhoni Reveals Why He Came Out To Bat Ahead Of Yuvraj Singh In 2011 ODI World Cup Final




**NEW DELHI :** MS Dhoni came out to bat at No. 5 for India in the 2011 ODI World Cup final, which was played against Sri Lanka at Wankhede Stadium in Mumbai on April 2, 2011, and remained unbeaten on 91 runs from 79 balls. Dhoni, who was leading India in that tournament, added 109 runs for the fourth wicket with Gautam Gambhir (97 runs from 122 balls) and 54 for the fifth wicket with Yuvraj Singh (21 not out from 24 balls) to help India successfully chase down the target of 275 runs in 48.2 overs and win the ODI World Cup final by six wickets. Dhoni's promotion in the batting order ahead of in-form Yuvraj came as a surprise for many fans at that time, and now finally Dhoni has explained the reason behind taking that decision. In a video going viral on the internet from a recent event, Dhoni opened up about the decision to come ahead of Yuvraj in the final and said that he wanted to go because of the presence of three off-spinners in Sri Lanka's playing XI, two of whom were his former teammates at Chennai Super Kings. "Gautam (Gambhir) and Virat (Kohli) had a very good partnership, and Yuvraj was in form. Yuvi was having a very good World Cup. So, the tricky decision was whether Yuvi should go in or, you know, I wanted to… there was something in me; I wanted to go," Dhoni said. "The reason was simple; it was very experience-driven. If you look at the (Sri Lankan) bowling at that time, the bowlers who were going to bowl in the middle overs. Murli sir (Muralitharan) was there, Suraj Randiv was there, and (Tillakaratne) Dilshan was there in the part-timers, all three of them off-spinners. And two of the three off-spinners had played for CSK. So, Murli sir was with CSK, Suraj Randiv was with CSK, which meant that I had batted them a lot in nets. And it is said that it becomes a little easier to play off spinners for righties (right-handed batters)," he continued.

# D Gukesh loses to Arjun Erigaisi in final round, suffers first defeat as world champion




**NEW DELHI :** D Gukesh suffered his first defeat since being crowned the youngest chess world champion in December, losing to compatriot Arjun Erigaisi in the Tata Steel Chess tournament on Sunday. Gukesh, who had defeated Chinese Grandmaster Ding Liren to be crowned the 18th and youngest chess world champion in Singapore in December, ended up losing to Arjun despite playing with white pieces, resigning in 31 moves.

This was after he began with a King's Pawn Opening that developed into a Petrov's Defense: Classical Variation, and played a couple of good moves (9. Bg2; 13. d4), initiating a bishop exchange in the 14th move. Things, however, started going downhill for the 18-year-old GM after he negated the promising start with a couple of questionable moves (18. Rd1; 20. Bf4).

Gukesh's King and Queen were eventually cornered by Arjun's rooks along the 'H' file (1 and 2) in the 31st move, and at that point, it was game over for him.

Gukesh had recently surpassed Arjun as the highest-ranked Indian player, but on Sunday, it was the latter who gave his good friend a reminder of the skill and mindset that made him one of the best players globally in the current generation.


Gukesh missed out on the opportunity to seal the Tata Steel Chess title with a victory, but wasn't the only Indian finishing on the losing side on Sunday.

R Praggnanandhaa, who was tied on 8.50 points with Gukesh ahead of the final round with the two Indians sharing the top spot in the Masters standings, lost to German grandmaster Vincent Keymer while playing with black pieces. Praggnanandhaa, who is only a year older than Gukesh, surrendered after waging a fierce battle that lasted till the 80th move.

While Arjun finished 10th with back-to-back wins after failing to win a single game in the first 11 rounds, Gukesh and Praggnanandhaa remained tied on 8.50 points after losing their final games. Nodirbek Abdusattorov could have joined the two and made it a three-way blitz tie-break for the title had he won his final game.

The Uzbekistani GM, however, was held to a draw by India's Pentala Harikrishna, meaning either Gukesh or Praggnanandhaa would become only the second Indian to win the prestigious tournament after the legendary Viswanathan Anand.

# Praggnanandhaa stuns Gukesh in playoffs after late drama to win Tata Steel Chess 2025




**NEW DELHI :** The Tata Steel Chess 2025 Masters title was decided in playoffs with Indian Grandmaster R Praggnanandhaa defeating world champion and fellow compatriot D Gukesh to clinch the trophy on Sunday at Wijk aan Zee in the Netherlands. Both Indian chess stars entered the final round as joint leaders but failed to win their respective matches resulting in a blitz playoffs.

In the blitz playoffs, Gukeh won the first game but lost the next two as Praggnanandhaa won the Tata Steel Chess title also known as the 'Wimbledon' of chess. Earlier, Gukesh had lost to India's Arjun Erigaisi in 31 moves, the 18-year-old world champion's first defeat since winning the World Chess Championship 2024.

Praggnanandhaa went down to German Grandmaster Vincent Keymer in Round 13 after a hard-fought battle that lasted nearly seven hours.

Uzbek Grandmaster Nodirbek Abdusattorov finished third at the Tata Steel Chess 2025. He could have joined the playoffs with a win in Round 13 but eventually settled for a draw against India's Pentala Harikrishna and came third.

**Gukesh vs Praggnanandhaa tiebreakers**

In the first game, Praggnanandhaa faced the Benoni with reversed colours in the first game of the tiebreak and it seemed like he had equalised easily in the middle game. However, Gukesh had other thoughts as he kept trying and won, thanks to a blunder by Praggnanandhaa that cost him a full rook.

In a must-win second game of the tiebreaker, Praggnanandhaa employed the Trompowsky opening, and this time Gukesh could claim a slight advantage with his black pieces.

However, by just keeping his position together, Praggnanandhaa patiently waited and capitalised on an unforced error from his opponent to first knock down a pawn and then his technical abilities were enough to see the normal blitz games through with a 1-1 score.

This took the match into sudden-death, where Praggnanandhaa drew white and once again Gukesh was better with some imaginative play on the queen side that netted him a pawn.

The sudden-death had a time control of two minutes and thirty seconds for white against three for black but that did not deter Praggnanandhaa from trying to defend an inferior endgame.

Just while the position looked completely drawn and another game was on the cards, Gukesh lost complete control in the battle of nerves and first lost a pawn then his last remaining knight.

Praggnanandhaa showed perfect technique to take the full point and his maiden victory at the Masters.

For Gukesh, this was the second year running when he tied for first position and lost the tiebreaker. In the previous edition last year, Gukesh had lost to Chinese Wei Yi.

**Indian GMs struggle in Challengers section**

After Gukesh and Praggnanandhaa, the next best performance by an Indian in the Masters section was from Hariskrishna as he finished seventh with 6.5 points. Arjun came 10th (5.5 points) after winning his last two matches while Luke Leon Mendonca finished 13th (5 points).

The Challengers section was won by Czech Republic's Thai Dai Van Nguyen who accumulated 9.5/13 points and will be part of the Masters tournament next year. Azerbaijani Grandmaster Aydin Suleymanli finished on same number of points but missed qualification by the Sonneborn-Berger tiebreak.

India's R Vaishali finished ninth with six points while Divya Deshmukh took the 13th spot (3.5 points).

Tata Steel Masters Final Round 13 Masters Standings: 1st Gukesh, D 8.5pts, 2nd Praggnanandhaa, R 8.5pts, 3rd Abdusattorov, Nodirbek 8pts, 4th Fedoseev, Vladimir 7.5pts, 5th Giri, Anish 7pts, 6th Wei, Yi 7pts, 7th Harikrishna, Pentala 6.5pts, 8th Caruana, Fabiano 6pts, 9th Keymer, Vincent 6pts, 10th Erigaisi, Arjun 5.5pts, 11th Van Foreest, Jorden 5.5pts, 12th Sarana, Alexey 5.5pts, 13th Mendonca, Leon Luke 5pts, 14th Warmerdam, Max 4.5pts.

Tata Steel Challengers Final Round 13 Challengers Standings: 1st Nguyen, Thai Dai Van 9.5pts, 2nd Suleymanli, Aydin 9.5pts, 3rd L'Ami, Erwin 8.5pts, 4th Yakubboev, Nodirbek 8pts, 5th Bok, Benjamin 8pts, 6th Gurel, Ediz 7.5pts, 7th Svane, Frederik 7.5pts, 8th Nogerbek, Kazybek 7.5pts, 9th Vaishali, Rameshbabu 6pts, 10th Lu, Miaoyi 5.5pts, 11th Pijpers, Arthur 5.5pts, 12th Oro, Faustino 3.5pts, 13th Divya, Deshmukh 3.5pts, 14th Bulmaga, Irina 1pt.

# 5 of Abhishek Sharma's sixes to marvel at

Abhishek Sharma slammed 13 sixes in his belligerent assault on England to completely bedazzle the visitors and bat them out of the contest as 99 of his 135 came off boundaries. But here are fine of the finest maximums.

**Over 2.6: Archer to Abhishek**

One ball earlier he had managed a maximum over point for six. Jofra Archer responded with a 148 kmph and Abhishek made room for himself to be in a position from where he could get the ball at full length. It was a decent ball but the space gave him additional power to generate. He hammered one inside-out to the world's fastest seamer and got legendary Sunil Gavaskar calling it one of the best shots of the series. The lofted cover drive six left people mesmerised. The timing and power generated had sheer elegance and class in it. The second six ended up even better.

**Over 4.1: Overton to Abhishek**

He went back inside his crease, like his opening team mate Sanju Samson does. Jamie Overton bowled an off-cutter but Abhishek was in a position where he just needed to find the middle of his blade and loft it straight back to long-off for his fourth six. He had all the time to be behind the ball. His head position remained still and his back leg was near the off-middle stump. His timing remained the highlight of his batting so far with the high backlift adding more power.

**Over: 6.4: Rashid to Abhishek**

He came down the ground, his backfoot still in the air and Abhishek charged into a lofted six over the bowlers' head to get his sixth six in the game. The ball was dispatched a few meters away from the commentary box, and looked like this one stroke was for the commentators. They too were short of words as Abhishek continued his assault. The elegant opener was in sublime touch and there was hardly any time when he didn't get the sweet spot off his bat.

# मराठीचा अनादर करणाऱ्यांची दादागिरी ठेचून काढू

## मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांचा इशारा



● पुणे, अभिजीत येरल्लू :

महाराष्ट्रात मराठीचा अनादर करणाऱ्यांची दादागिरी ठेचून काढू, असा इशारा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी रविवारी दिला. येत्या पंधरवड्यात माझ्या विभागाअंतर्गत राज्यातील सर्व पोलीस अधीक्षकांची बैठक बोलावून त्यांना या संदर्भात सूचना करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. भाषेच्या संवर्धनासाठी मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायासंदर्भात राज ठाकरे आणि त्यांचा पक्ष करत असलेले काम कौतुकास्पद आहे. शासन म्हणून आम्ही त्यांच्या भूमिकेसोबत राहू, अशी ग्वाही सामंत यांनी दिली.

'आपलीच भाषा बोलली पाहिजे असा अन्य राज्यातील लोकांचा दबाव मुंबई, ठाणे, मुंब्रा, पुणे येथे काही लोक आणत आहेत. गेल्या तीन महिन्यांत हे प्रकार वाढल्याचे दिसून येत आहे. याबद्दलचा कायदा आहे. परंतु असा दबाव आणून मराठी भाषा बोलल्याबद्दल जर मारहाण होत असेल, तर हा कायदा कडक झाला पाहिजे', असे सामंत यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. या विषयासंदर्भात पोलीस अधीक्षकांच्या बैठकीनंतर आवश्यकता भासल्यास शासन अध्यादेश काढण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

माजी आमदार चंद्रकांत मोकाटे आणि महादेव बाबर यांची भेट हा 'मिशन टायगर'चा भाग नव्हता. पण, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदरापोटी कोणी पक्षात येऊ इच्छित असेल तर मिशनशिवायही ते येऊ शकतात, असे खुले आमंत्रण सामंत यांनी दिले.

निवडणुकीनंतर एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री होतील, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली होती, या ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केलेल्या दाव्यासंदर्भात बोलताना सामंत म्हणाले, 'आता हे शहा यांना आणि ज्यांनी सांगितले त्यांना विचारले पाहिजे. राऊत यांना पत्रकार परिषद घेण्याचे व्यसन लागले आहे.' आता मी त्यांच्या वेळेच्या आधी पत्रकार परिषद घ्यावी म्हणतो आहे, अशी मिश्किल टिप्पणीही सामंत यांनी या वेळी केली.

उद्योग येत असलेल्या ठिकाणी चॅप्टर ६ जाहीर झाल्यानंतर खरेदी-विक्रीचे व्यवहार काही काळ होऊ नयेत अशा पद्धतीचा कायदा करण्याच्या मन:स्थितीत आम्ही आहोत. एकदा प्रकल्प झाल्यानंतर बाहेरच्या कोणाला त्या जमिनी खरेदी करता येणार नाहीत, असा नियम त्या कायद्यामध्ये अंतर्भूत असेल. – उदय सामंत, उद्योगमंत्री

# मुख्यमंत्र्यांनी घेतला फ्लॅगशीप योजनांचा आढावा

## प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांच्या कामांना गती द्या – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ ग्रामीण आवासच्या १९.६६ लाख उद्दिष्टांपैकी १६.८१ लाख घरकुलांना मंजुरी
■ शहरी आवास योजनांनाही गती देण्याचे निर्देश
■ जलजीवन मिशनची कामे वेगाने पूर्ण करा
■ आयुष्मान कार्ड वितरणातील त्रुटी दूर करून कार्डचे वाटप पूर्ण करा

● मुंबई, विशाल पाटील :

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोनमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रासाठी १९ लाख ६६ हजार घरकुलांचे उद्दिष्ट ठेवले आहे. आतापर्यंत १६ लाख ८१ हजार ५३१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीची मदत घेऊन कामांना गती देण्याचे व घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक क्षेत्रातील फ्लॅगशिप योजनांचा वॉररुममध्ये आढावा घेऊन या योजनांना गती देण्याचे निर्देश दिले. यामध्ये आरोग्य, गृहनिर्माण व पाणी पुरवठा विभागाच्या योजनांच्या सद्यस्थितीचा जिल्हानिहाय आढावा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी घेतला. उपमुख्यमंत्री अजित पवार, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री पंकज भोयर, योगेश कदम, मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव उपस्थित होते.

शहरी व ग्रामीण भागातील प्रधानमंत्री आवास योजनांच्या सद्यस्थिती व अंमलबजावणीची माहिती घेऊन श्री. फडणवीस म्हणाले की, भूमीहीन लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून देण्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे, ही आनंदाची बाब आहे. मात्र, उर्वरित लाभार्थ्यांना तातडीने जमिन उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समन्वयाने मार्ग काढावेत. ज्या जिल्ह्यांत घरकुलांचे उद्दिष्टपूर्ती कमी आहे, तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी ती पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावेत. तसेच घरकुल योजनेतील अडचणी दूर करून कामांना वेग द्यावे. गायरान जमिनींवरही आवास योजना राबविण्यासाठी कार्यवाही करावी. आवास योजनांसाठीच्या जमिनींच्या समस्या सोडविण्यासाठी विभागीय आयुक्तांनी प्राधान्य द्यावे.



### आयुष्मान कार्डच्या वितरणाला गती द्यावी

■ आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा लाभ राज्यातील रुग्णांना मिळावा, यासाठी नोंदणीच्या कामाला गती द्यावी. तसेच यामधील मानवी हस्तक्षेप विरहित डिजिटल यंत्रणा सज्ज करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

■ या दोन्ही योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळण्यासाठी जास्तीत जास्त खाजगी रुग्णालयाचा तसेच मुंबई शहर व उपनगरातील महापालिकेच्या रुग्णालयांचाही समावेश करावा. आयुष्मान कार्डच्या प्रत्यक्ष १०० टक्के वितरणाकरिता तांत्रिक अडचणी दूर करून आयुष्मान कार्डच्या वितरणाला गती द्यावी. तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेसाठीही आयुष्मान कार्ड सारखे कार्ड तयार करण्यात यावे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

■ महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजनामध्ये रुग्णालयांच्या समावेशासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# इंग्लंडच्या प्रिन्स एडवर्ड यांची राज्यपालांशी भेट

## भारत - ब्रिटन परस्पर सहकार्य वाढविण्यावर चर्चा



● मुंबई, विशाल कारंडे :

सध्या मुंबई भेटीवर असलेल्या ड्यूक ऑफ एडिनबर्ग प्रिन्स एडवर्ड यांनी रविवारी (2 फेब्रुवारी) महाराष्ट्राचे राज्यपाल आणि विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली.

राणी एलिझाबेथ द्वितीय व ड्यूक ऑफ एडिनबर्ग प्रिन्स फिलिप यांचे सर्वात धाकटे सुपुत्र; तसेच राजे चार्ल्स तृतीय यांचे धाकटे बंधू असलेल्या प्रिन्स एडवर्ड यांनी भारत आणि ब्रिटन मधील संबंध मजबूत होत असल्याबद्दल समाधान व्यक्त करताना उभय देशांमधील सहकार्य अधिक वृद्धिंगत होण्याची इच्छा व्यक्त केली.

आपण इंग्लंडमधील बाथ विद्यापीठाचे पदसिद्ध कुलपती असल्याचे सांगताना उच्च शिक्षण क्षेत्रातील सहकार्य भारत व इंग्लंड या दोन्ही देशांसाठी फायदेशीर ठरेल असे त्यांनी नमूद केले.

व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना युवराज एडवर्ड यांनी वर्गखोलीच्या बाहेर होत असलेले शिक्षण देखील जीवनात महत्वाचे असल्याचे सांगितले.

भारतात क्रिकेट 'अभूतपूर्व' वाढले असल्याचे नमूद करून बॅडमिंटनमधील भारताच्या प्रगतीचेही त्यांनी कौतुक केले. रविवारी संध्याकाळी मुंबईत होणाऱ्या भारत आणि इंग्लंड यांच्यातील टी-२० सामन्याच्या नाणेफेकीचा वेळी आपण उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सध्या अस्तित्वात असलेल्या कॉमनवेल्थ क्रीडा महोत्सवासोबतच कॉमनवेल्थ व्यवसाय महोत्सव आणि सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्याच्या संकल्पनेवर देखील यावेळी चर्चा झाली.

प्रिन्स एडवर्ड यांचे राज्यात स्वागत करताना भारत आणि इंग्लंड ही जगातील दोन महान लोकशाही राष्ट्रे असल्याचे राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी सांगितले.

भारतीय लोकांना इतर देशांच्या तुलनेत लंडनमध्ये 'आपल्या घरासारखे' वाटते, असे सांगताना उच्च शिक्षण दोन्ही देशांमध्ये सहकार्याचे महत्त्वाचे क्षेत्र ठरू शकते असे राज्यपालांनी सांगितले. भारतीय विद्यार्थ्यांना इंग्लंडमधील शिक्षण पद्धतीशी जुळवून घेणे अधिक सोपे जाते, असेही त्यांनी नमूद केले.

हरित ऊर्जा आणि औषधनिर्माण क्षेत्राबरोबरच भारताला इंग्लंडकडून हॉस्पिटल व्यवस्थापन क्षेत्रातील सहकार्याचा लाभ होऊ शकतो, असे राज्यपालांनी सांगितले. इंग्लंडमधील हॉस्पिटल व्यवस्थापन प्रणाली उत्तम असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यातील विद्यापीठांचे कुलपती या नात्याने आपण राज्यातील कुलगुरूंना इंग्लंडमधील विद्यापीठांसोबत सामंजस्य करार (MoU) करण्यासाठी प्रोत्साहन देऊ असेही राज्यपालांनी सांगितले.

भारत आज जगातील सर्वात बलशाली अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत असून आणि भारत - इंग्लंड यांच्यातील मजबूत व्यापार संबंध इतर अनेक क्षेत्रांतील संबंध बळकट करण्यास साहाय्यभूत ठरतील, असे राज्यपालांनी सांगितले.

भारत आणि इंग्लंड यांच्यात मुक्त व्यापार करार करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

भारतात क्रिकेटशिवाय फुटबॉल खेळ अतिशय लोकप्रिय असून, देशात फुटबॉलला अधिक चालना देण्यासाठी इंग्लंडने भारताला मदत करावी, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

बैठकीला ब्रिटनचे उप-उच्चायुक्त हरजिंदर कांग, ड्यूक यांचे खाजगी सचिव ॲलेक्स पॉट्स आणि राजकीय व द्विपक्षीय व्यवहार विभागप्रमुख जॉन निकेल उपस्थित होते.



# निबंध स्पर्धेमुळे भगवान महावीर यांचे जीवनकार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचेल - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

● मुंबई, राकेश गायकवाड :

आज जैन धर्म पश्चिम आणि उत्तर भारतात दिसत असला तरी एके काळी तामिळनाडू राज्यात जैन धर्मियांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. तामिळ भाषेत जैन साहित्य देखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. तीर्थंकर भगवान महावीर यांचे जीवनकार्य सर्वकाळ प्रेरणादायी असून भगवान महावीर यांच्या जीवनावर राज्यातील शाळाशाळांमधून निबंध स्पर्धा आयोजित केल्यामुळे भगवान महावीर यांचे जीवनकार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचेल, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

भगवान महावीर स्वामी २५५० निर्वाण कल्याणाक महोत्सव समितीतर्फे राज्यातील शाळांमध्ये आयोजित निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ राज्यपालांच्या हस्ते रविवारी (दि. २) राजभवन मुंबई येथे संपन्न झाला त्यावेळी ते बोलत होते.

भगवान महावीरांचे जीवन त्यागमय होते असे सांगताना केवळ स्वत:साठी जगणे पाप असून इतरांसाठी जगल्यास ईश्वर आपली काळजी वाहिल असे राज्यपालांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले. या स्पर्धेत राज्यातील शाळांमधील १.२ कोटी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला ही अतिशय उत्साहवर्धक बाब असल्याचे सांगून मुलांनी लिखाण तसेच वाचनाची सवय ठेवावी, अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली. मुलांनी मोबाईल फोनवर आपला वेळ वाया न घालवता वेळेच नियोजन करून मोबाईलचा वापर करावा अशी सूचना त्यांनी यावेळी केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखविण्यात आला.

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मुलांच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम राजभवन येथे होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. अहिंसा परमो धर्म हा भगवान महावीरांचा संदेश घरोघरी पोहोचवण्यासाठी स्पर्धा उपयुक्त असल्याचे आमदार चैनसुख संचेती यांनी सांगितले. स्पर्धेमुळे १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी भगवान महावीरांच्या जीवनाचे अध्ययन केले असे जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

# साधुग्राम अतिरिक्त जागेसाठी मेरीच्या जागेचा विचार


● नाशिक, सचिन कदम :

२०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळयात सुमारे ४०० एकर जागेवर साधुग्राम उभारण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. त्याकरिता तपोवनमधील ३१८ एकर जागा निश्चित असून अतिरिक्त जागेसाठी दिंडोरी रस्त्यावरील महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेच्या (मेरी) १०० एकर जागेचा विचार प्रशासकीय पातळीवर सुरू झाला आहे. गोदाकाठ परिसरात पाच नवीन पूल उभारण्याचे नियोजन आहे. नाशिक, त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने जिल्ह्याचे पालक सचिव तथा ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी बैठक घेतली. कुंभमेळयासाठी ज्या महत्वाच्या कामांना वेळ लागणार आहे, ती तातडीने सुरू करण्याचे निर्देश त्यांनी दिले. कागदावर चित्र रंगवण्याऐवजी प्रत्यक्ष जागेवर काय आवश्यकता आहे, याचा विचार करून नियोजनाची गरज त्यांनी मांडली.

# शिवराज पराभूत झाल्याचं सिद्ध झालं तर १ कोटी रुपये देऊ, प्रशिक्षकाचं खुलं आव्हान

● सांगली, राकेश गायकवाड :

अहिल्यानगर येथे झालेली महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. पंचाने घेतलेल्या निर्णयावर संताप व्यक्त करत शिवराज राक्षेने त्यांना लाथ मारली. त्यामुळे शिवराजवर पुढील ३ वर्ष बंदी घालण्यात आली आहे. आता या प्रकरणात शिवराज राक्षे यांच्या प्रशिक्षकांनी खुलं आव्हान दिले आहे. शिवराज पराभूत झाल्याचं सिद्ध झाल्यास १ कोटी रूपये बक्षिस देऊ असं प्रशिक्षक रणधीर पोंगल यांनी म्हटलं आहे. शिवराज राक्षेचे प्रशिक्षक रणधीर पोंगल म्हणाले की, महाराष्ट्र कुस्ती स्पर्धा पूर्व नियोजित होती, कुणाला महाराष्ट्र केसरी बनवायचं हे आधीच ठरले होते. केवळ एकच माणूस हे सर्व करतोय. कुस्तीत एक खांदा खाली टेकलाय त्यावर निर्णय दिला. मी आक्षेप घेतला. रामदास तडस, मुरलीधर मोहोळ, स्थानिक आमदारांनीही व्हिडिओ दाखवण्यास सांगितले तरीही मला व्हिडिओ दाखवला नाही. हे काय सुरू आहे. उडवाउडवी उत्तरे दिली जात होती असा आरोप त्यांनी केला. तसेच तुम्ही या स्पर्धेचं चित्रिकरण WFI आणि FILA या आंतरराष्ट्रीय संघटनांना पाठवा आणि कुस्तीचा निर्णय मागवा. जर कुणी म्हटलं शिवराज राक्षे पराभूत झाला तर मी १ कोटीचं चॅलेंज देतो असंही रणधीर पोंगल यांनी म्हटलं आहे.दरम्यान, शिवराज जवळपास १६ वर्ष तालीम करतोय. कुस्ती क्षेत्राच्या कारकिर्दीत त्याच्या इथून मागच्या कुस्त्या पाहा. जिंकला तरी हुरळून जात नाही आणि पराभव झाला तरी खचून जात नाही. ही कुस्ती आहे.



# मुनावळे येथील कोयना जलाशय शिल्लक जमीन व गावठाण प्रकल्पग्रस्तांना देण्याचा आज आढावा बैठकीत होणार निर्णय ... ?

● सातारा, दिगंबर जाधव:

महाराष्ट्राला प्रकाशमान करणाऱ्या कोयना धरणासाठी अनेकांनी त्याग केला. आणि त्याची तिसरी पिढी पुनर्वसनासाठी टाहो फोडत आहे. जावळी तालुक्यातील मुनावळे येथील कोयना जलाशय पातळी पासून शिल्लक असणारी २१६५ चे वरील शिल्लक जमिनी व गावठाण प्रकल्पग्रस्तांना विस्थापित खातेदारांना आदेशानुसार ७/ १२ उतारा तयार करुन मिळणे बाबत आंदोलन करत आहेत. आज जावळी तालुक्याचे ठिकाण असलेल्या सोमवार दिनांक 3 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मेढ्यातील आढावा बैठकीत याबाबत सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले काय निर्णय घेतील? याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

सर्व ग्रामस्थ ग्रामपंचायत मुनावळे. ता. जावली, जि. सातारा कोयना प्रकल्पग्रस्त आहेत. सदरील ठिकाणची शेतजमिन ही महाराष्ट्र शासनाने सन १९६० रोजी कोयना धरणासाठी संपादन केली होती. सदर जमिन संपादित केल्यानंतर मुनावळे येथील भूमिपुत्र व सर्वजण २१६५ वरील क्षेत्रामध्ये विस्थापित झाले होते. सदर कोयना धरणासाठी संपादित केलेल्या जमिनीपैकी कोयना शिवसागर जलाशयाच्या पाण्याची पातळी २१६५ चे वरील जमिन या प्रकल्पासाठी लागणार नसल्याने त्या विस्थापितखातेदारांना परत वाटप करण्यासाठी दि. १५७ / १२ / १९७६ मे. एक्झिक्युटीव्ह इंजिनियरकोयना विभाग पोकळी यांचेकडील पत्र क्र. केडी/ टीडी/जेए /१०१/११३३५,१४/१०/१९७६ च्या पत्रानुसार जिल्हाधिकारी सातारा तर्फे प्रतिनिधी सर्कल इन्स्पेक्टर बामणोली यांच्या ताब्यात दिलेल्या आहेत.



सदर सर्व्हे नं. १/१ क्षेत्र ०- १८ ते सर्व्हे नं. २१४, क्षेत्र ०-३० असे ता. एकूण क्षेत्र ४२० एकर ४ गुंठे हे क्षेत्र कोयना जलाशय पाण्याच्या पातळीच्या २१६५ चे वरील जमिन असल्याने त्या प्रकल्पासाठी लागणार नाहीत. त्याअनुषंगाने मुळ विस्थापित खातेदारांना दि. १३/०६/१९९० नुसार देण्यात आलेल्या आदेशाप्रमाणे ७/१२ उताऱ्यास नोंद करुन मिळावी. गेली ४५ ते ५० वर्ष मुनावळे ग्रामस्थ शासकीय पातळीवर लोकशाही मार्गाने लढा देत आहेत.

राज्याचे तात्कालीन मुख्यमंत्री व अनेक मंत्री व लोकप्रतिनिधींनी या गावाला भेट देऊन त्यांच्या जमिनी बाबत सकारात्मक निर्णय घेतला. परंतु, त्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी वर्ग हे पुनर्वसनाच्या कायद्याचा किस काढून या प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या हक्काच्या जमिनीपासून वंचित ठेवत आहे. असा आरोप आता धरणग्रस्त नेते सुद्धा करू लागलेले आहेत. वास्तविक पाहता कसेल त्याचीच जमीन हा सुद्धा कायदा आहे. तसेच भूमिहीन लोकांना सुद्धा जमिनीची वाटप केले जाते. परंतु ज्यांनी धरणासाठी जमीन दिली आणि जे शिल्लक राहिली ती जमीन मागण्याचा अधिकार असूनही त्यापासून डावलले जात आहे. या हक्काच्या मागणीसाठी तिसरी पिढी शासन दरबारी टाहो फोडत आहे. मुनावळे या ठिकाणी जागतिक दर्जाचे जल पर्यटन होत असल्याने या ठिकाणच्या स्थानिक भूमिपुत्रांना न्याय मिळण्याची आशा पल्लवीत झालेली आहे. पर्यटन वाढीतून रोजगार निर्मिती होणे गरजेचे आहे पण, या ठिकाणी स्थानिक भूमिपुत्रांकडे सातबारा नसल्यामुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही.

मग जागतिक जल पर्यटनामध्ये मुनावळे स्थानिक ग्रामस्थ कुठे असतील, ? याचा मानवता भावनेतून विचार करावा. अशी मागणी निलेश भोसले, गणेश भोसले, संतोष जाधव ,संदीप जांभळे, आनंद भोसले, किरण भोसले, विलास भोसले व स्थानिक ग्रामस्थांनी केलेली आहे. आज सोमवार दिनांक 3 फेब्रुवारी रोजी जावळी पंचायत समिती कार्यालयात होणाऱ्या आढावा बैठकीत मुनावळे ग्रामस्थांच्या मागणीकडे लक्ष वेधून श्रीमंत छत्रपती अभयसिंह राजे भोसले स्मृतिदिन पूर्वसंध्येला न्याय मिळावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.